# कृषि पणन विषयक बातम्या : ऑगस्ट 2024

प्रजापत्र

31AUG2024

## शेतमाल तारण कर्ज योजना कार्यशाळा



लातूर दि. ३० (प्रतिनिधी) : महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, विभागीय कार्यालय, लातूर येथे लातूर विभागातील बाजार समितींच्या सचिवांची शेतमाल तारण कर्ज योजना हंगाम 2024-25 विषयी एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती प्रतिमेचे पुजन करुन कार्यक्रमाचे उद्घटन करण्यात आले.

यावेळी महादेव बरडे, उपसरव्यवस्थापक, म.रा. कृषि पणन मंडळ, विभागीय कार्यालय लातूर यांनी शेतक-यांसाठी बाजार समितींमार्फत राबविण्यात येणा-या पणन मंडळाच्या शेतमाल तारण कर्ज योजनेचे महत्व, प्रचार प्रसिध्दी, योजनेची अंमलबजावणी विषयी मार्गदर्शन केले. न्यु इंडिया अँश्युरंस कं.लि.च्या विभागीय व्यवस्थापिका शारदा मांडवेकर यांनी गोदाम व गोदामातील शेतमालाचा विमा विषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. निलेश लांडे, विभागीय व्यवस्थापक, म.रा. वखार महामंडळ, विभागीय कार्यालय, लातूर यांनी गोदामातील शेतमालाची साठवणुक, वखार पावती वरील कर्ज याबाबत माहिती दिली. शिवानंद राठोड यांनी केंद्र शासनाच्या गोदाम विकास आणि नियामक प्राधिकरणाकडे गोदामाची नोंदणीचे महत्व, फायदे व नोंदणी कशी करावयची याची माहिती दिली.

यावेळी पणन मंडळाचे विभागीय कार्यालयाचे व्यवस्थापक राहुल गोरे यांनी शेतमाल तारण कर्ज योजनेची माहिती पणन मंडळाच्या ई.आर.पी. प्रणाली मध्ये भरणा करण्याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. महाराष्ट्र सहकार विकास महासंघाचे प्रशांत चासकर यांनी गोदामातील शेतमालाचे साठवणुकीचे महत्व, प्राथमिक प्रक्रिया उद्योग, मुल्य साखळी महत्व विषयी मार्गदर्शन केले.

गोदामास प्रत्यक्ष भेट देउन वखार महामंडळाचे व्यवस्थापक सुरेश माने यांनी गोदामा मध्ये शेतमालाची साठवणुक करताना कोणती काळजी घेणे आवश्यक आहे, गोदामातील शेतमालचे संरक्षणासाठीच्या उपाय योजना, शेतमालाची थप्पी लावताना काय काळजी घ्यावी या विषयी प्रात्यक्षिकासह उपस्थितांना माहिती दिली. लातूर हाजार समितीचे भास्कर शिंदे, सहाय्यक सचिव यांनी बाजार समितीं मार्फत राबविण्यात आलेल्या शेतमाल तारण कर्ज योजनेची व यासाठी आवश्यक कागदपत्रे व रजिस्टरची माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री.अवधूत तांबे यांनी केले व उपस्थितांचे आभार पणन मंडळाचे व श्री.सिद्दीकी एफ.एफ. यांनी मानले.

पुरोगामी विचाराचे
एकमत



# लातूर येथे शेतमाल तारण कर्ज योजना कार्यशाळा

**लातूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, विभागीय कार्यालय, लातूर येथे लातूर विभागातील बाजार समितींच्या सचिवांची शेतमाल तारण कर्ज योजना हंगाम २०२४-२५ विषयी एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली.

यावेळी महादेव बरडे, उपसरव्यवस्थापक, म.रा. कृषि पणन मंडळ, विभागीय कार्यालय लातूर यांनी शेतक-यांसाठी बाजार समितींमार्फत राबविण्यात येणा-या पणन मंडळाच्या शेतमाल तारण कर्ज योजनेचे महत्व, प्रचार प्रसिध्दी, योजनेची अंमलबजावणी विषयी मार्गदर्शन केले. न्यु इंडिया अँशुरंस कं.लि.च्या विभागीय व्यवस्थापिका शारदा मांडवेकर यांनी गोदाम व गोदामातील शेतमालाचा विमा विषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. निलेश लांडे, विभागीय व्यवस्थापक, म.रा. वखार महामंडळ, विभागीय कार्यालय, लातूर यांनी गोदामातील शेतमालाची साठवणुक, वखार पावती वरील कर्ज याबाबत माहिती दिली. शिवानंद राठोड यांनी केंद्र शासनाच्या गोदाम विकास आणि नियामक प्राधिकरणाकडे गोदामाची नोंदणीचे महत्व, फायदे व नोंदणी कशी करावयची याची माहिती दिली.




यावेळी पणन मंडळाचे विभागीय कार्यालयाचे व्यवस्थापक राहुल गोरे यांनी शेतमाल तारण कर्ज योजनेची माहिती पणन मंडळाच्या ई.आर.पी. प्रणाली मध्ये भरणा करण्याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. महाराष्ट्र सहकार विकास महासंघाचे प्रशांत चासकर यांनी गोदामातील शेतमालाचे साठवणुकीचे महत्व, प्राथमिक प्रक्रिया उद्योग, मुल्य साखळी महत्व विषयी मार्गदर्शन केले.

गोदामास प्रत्यक्ष भेट देउन वखार महामंडळाचे व्यवस्थापक सुरेश माने यांनी गोदामा मध्ये शेतमालाची साठवणुक करताना कोणती काळजी घेणे आवश्यक आहे, गोदामातील शेतमालचे संरक्षणासाठीच्या उपाय योजना, शेतमालाची थप्पी लावताना काय काळजी घ्यावी या विषयी प्रात्यक्षिकासह उपस्थितांना माहिती दिली. लातूर हाजार समितीचे भास्कर शिंदे, सहाय्यक सचिव यांनी बाजार समितीं मार्फत राबविण्यात आलेल्या शेतमाल तारण कर्ज योजनेची व यासाठी आवश्यक कागदपत्रे व रजिस्टरची माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अवधूत तांबे यांनी केले. उपस्थितांचे आभार सिद्दीकी एफ.एफ. यांनी मानले.

सकाळ अॅग्रोवन
लातूर, शुक्रवार, ३० ऑगस्ट २०२४

# 'पणन'कडून बाजार समिती सचिवांना कानमंत्र

## लातूरला शेतीमाल तारण योजनेच्या कार्यशाळेला प्रतिसाद

**अॅग्रोवन वृत्तसेवा**

लातूर : शेतीमालाच्या बाजारातील भावाच्या चढउताराचा फायदा शेतकऱ्यांना करून देण्यासाठी महत्त्वाकांक्षी ठरलेल्या शेतीमालतारणयोजनेच्या अंमलबजावणीसाठी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांना पणन मंडळाकडून कानमंत्र देण्यात आला. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या येथील विभागीय कार्यालयात बुधवारी (ता. २८) घेण्यात आलेल्या शेतीमाल तारण कर्ज योजनेत चालू हंगामासाठी घेण्यात आलेल्या कार्यशाळेला विविध ठिकाणांहून आलेल्या सचिवांनी प्रतिसाद दिला.



**लातूर : गोदामातील शेतीमालाच्या साठवणुकीची माहिती बाजार समिती सचिवांना देताना वखार महामंडळाचे अधिकारी.**

कार्यशाळेत मंडळाचे उपसरव्यवस्थापक महादेव बरडे यांनी शेतकऱ्यांसाठी बाजार समितींच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या शेतीमाल तारण कर्ज योजनेचे महत्त्व, प्रचार प्रसिद्धी व अंमलबजावणीविषयी मार्गदर्शन केले. बाजारात मोठ्या प्रमाणात शेतीमाल आल्यानंतर भाव कमी होतात. आवक कमी झाल्यानंतर भाव वाढतात. भाव वाढेपर्यंतच्या काळात शेतकऱ्यांना तातडीच्या आर्थिक गरजा भागवण्यासाठी शेतीमाल तारण योजनेतून कमी दरात कर्ज उपलब्ध करून दिले जाते. यामुळे गरजा भागतात व शेतकऱ्यांना वाढलेल्या भावाचा लाभही मिळतो. शेतकऱ्यांसाठी महत्त्वाच्या असलेल्या योजनेसाठी बाजार समितीच्या सचिवांनी पुढे यावे, असे आवाहन श्री. बरडे यांनी केले.

कार्यशाळेत न्यू इंडिया अॅश्युरन्स कंपनीच्या विभागीय व्यवस्थापिका शारदा मांडवेकर यांनी गोदाम व गोदामातील शेतीमालाचा विम्यावर मार्गदर्शन केले. वखार महामंडळाचे विभागीय व्यवस्थापक नीलेश लांडे यांनी गोदामातील शेतीमालाची साठवणूक व वखार पावतीवर दिल्या जाणाऱ्या कर्जाची माहिती दिली. शिवानंद राठोड यांनी केंद्र सरकारच्या गोदाम विकास आणि नियामक प्राधिकरणाकडील गोदामाची नोंदणीचे महत्त्व, फायदे व नोंदणी कशी करावयची याची माहिती दिली. पणन मंडळाचे विभागीय कार्यालयाचे व्यवस्थापक राहुल गोरे यांनी शेतीमाल तारण कर्ज योजना व मंडळाच्या ईआरपी प्रणालीवर मार्गदर्शन केले. महाराष्ट्र सहकार विकास महासंघाचे प्रशांत चासकर यांनीही मार्गदर्शन केले.

### शेतीमाल साठवणुकीची प्रत्यक्ष माहिती

कार्यशाळेच्या दरम्यान सचिवांची गोदामास प्रत्यक्ष भेट घडवून आणत वखार महामंडळाचे व्यवस्थापक सुरेश माने यांनी गोदामातील शेतीमालाची साठवणूक करताना कोणती काळजी घेणे आवश्यक आहे, शेतीमालाच्या संरक्षणासाठीच्या उपाययोजना, शेतीमालाची थप्पी लावताना काय काळजी घ्यावी, याची प्रात्यक्षिकासह माहिती दिली. लातूर बाजार समितीचे सहायक सचिव भास्कर शिंदे यांनी बाजार समितीमार्फत राबवलेल्या शेतीमाल तारण योजना, आवश्यक कागदपत्रे व रजिस्टरची माहिती दिली. अवधूत तांबे यांनी सूत्रसंचालन केले. एफ. एफ. सिद्दीकी यांनी आभार मानले.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com


द्राक्ष परिषदेत बोलताना फलोत्पादन संचालक डॉ. कैलास मोते.

# बेदाणे शेडसाठी दहा लाखांची सबसिडी

**पिंपरी : पुढारी वृत्तसेवा**

▪ फलोत्पादन संचालक मोते यांची घोषणा

कांदा चाळींसारखे बेदाणे शेड उभारण्यासाठी राज्य सरकारकडून द्राक्ष बागाईतदारांना एकूण १० लाखांचे अनुदान (सबसिडी) देण्यात येणार आहे. मशिन आणि बांधकाम अशा दोन प्रकारच्या शेडसाठी हे अनुदान असणार आहे, असे राज्याचे फलोत्पादन संचालक डॉ. कैलास मोते यांनी जाहीर केले.

महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाच्या वतीने राज्य द्राक्ष परिषद वाकड येथील एका हॉटेलमध्ये शनिवारी (दि.२३) सुरू झाली. त्याचे उद्‌घाटन डॉ. कैलास मोते यांच्या हस्ते झाले. त्यानंतर ते बोलत होते. कार्यक्रमास राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्राचे संचालक डॉ. कौशिक बॅनर्जी, राष्ट्रीय संघाचे अध्यक्ष सोपान कांचन, कर्नाटक संघाचे अध्यक्ष कृष्णा रेड्डी, महाराष्ट्र संघाचे अध्यक्ष शिवाजी पवार, उपाध्यक्ष कैलास भोसले, खजिनदार सुनील पवार, चंद्रकात लांडगे व पदाधिकरी उपस्थित होते.

डॉ. कैलास मोते म्हणाले की, कांदा शेतकऱ्यांना कांदा चाळी उभारण्यासाठी सरकार अनुदान देते. त्याचप्रमाणे द्राक्ष शेतकऱ्यांना बेदाणे तयार करण्यासाठी शेड उभारण्यास अनुदान मिळावे, यासाठी द्राक्ष संघ आग्रही होता. त्यानुसार, बेदाणे शेडसाठी १० लाखांचे अनुदान सरकारकडून दिले जाणार आहे. ठिंबक सिंचनासाठी सन २०२० पासून सरकार ८० टक्के अनुदान देत आहे. द्राक्ष बागांवरील चांगल्या प्रतीचे आणि दीर्घकाळ टिकणारे प्लास्टिक कव्हर विद्यापीठाकडून तयार करून घेण्यात येत आहेत. फळांच्या उत्पादनाचा दर्जा अधिक सुधारण्यासाठी स्वतंत्र कौन्सिलची स्थापना करण्यात आली आहे. ते कौन्सिल फळाचा उच्च दर्जा, बाजारपेठ आदींबाबत मार्गदर्शन करणार आहे. द्राक्ष उत्पादन खर्चिक आहे. त्यासाठी ३ लाख ८० हजारांचे विमा कवच आहे.

सोपान कांचन म्हणाले की, द्राक्षाची वर्षाला मोठी निर्यात होत असून, वर्षाकाठी तब्बल ३ हजार ४०० कोटींचे परदेशी चलन मिळत आहे. परदेशात सर्व फळांची निर्यात होते, त्यात सर्वाधिक ३० टक्के द्राक्षांची निर्यात होते.

Pune Gramin Edition Edition
Aug 25, 2024 Page No. 06
Powered by: erelego.com

नवभारत

मार्गदर्शन | यशदा में फल, सब्जियां और फूल निर्यात सम्मेलन का किया गया उद्घाटन

# निर्यात के लिए बुनियादी ढांचा उपलब्ध कराएगी सरकार:कुमार

■ **पुणे (सं.)** राज्य में किसानों की आय बढ़ाने के लिए कृषि निर्यात सबसे अच्छा विकल्प है और इसके लिए मार्केटिंग बोर्ड और मैग्नेट प्रोजेक्ट के समन्वय से बुनियादी ढांचे, क्लस्टर, कोल्ड स्टोरेज और परिवहन प्रणाली जैसी सभी आवश्यक सुविधाएं प्रदान की जाएंगी, ऐसा प्रतिपादन सहकारिता एवं विपणन विभाग के प्रमुख सचिव अनुप कुमार ने किया.वह महाराष्ट्र राज्य कृषि विपणन बोर्ड और महाराष्ट्र कृषि व्यापार नेटवर्क (चुंबक) परियोजना के सहयोग से यशदा में आयोजित फल, सब्जियां और फूल निर्यात सम्मेलन के उद्घाटन पर बोल रहे थे. इस अवसर पर उद्योग विभाग के विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह, एपीडा के क्षेत्रीय प्रमुख प्रशांत वाघमारे, विदेश व्यापार महानिदेशालय के उप महानिदेशक दिलीराज दाभोले, भारतीय निर्यात संगठन महासंघ के क्षेत्रीय प्रमुख ऋषिकांत तिवारी, आरपीक्यूएस मुंबई के संयुक्त निदेशक डॉ. ब्रिजेश मिश्रा, जेएनपीटी के विश्वनाथ धरत, कृषि विपणन बोर्ड के महाप्रबंधक विनायक कोकरे, कार्यकारी निदेशक संजय कदम आदि उपस्थित थे.

## कृषि निर्यात में महाराष्ट्र अग्रणी



अनुप कुमार ने कहा कि, कृषि निर्यात में महाराष्ट्र अग्रणी है. राज्य में पहला कृषि निर्यात सम्मेलन फरवरी 2022 में आयोजित किया गया था. सम्मेलन में केंद्र की कृषि निर्यात नीति 2018 पर विचार-विमर्श किया गया और राज्य की कृषि निर्यात नीति 2021 की घोषणा की गई. इसी नीति को संशोधित करने के लिए इस सम्मेलन का आयोजन किया गया है. कार्गो रूट बदलने के कारण निर्यात माल को पहुंचने में 15 से 27 दिन का समय लगता है. रूस और यूक्रेन युद्ध, बांग्लादेश में राजनीतिक घटनाक्रम ने निर्यात को प्रभावित किया है. रास्ता निकालने की कोशिशें जारी हैं.

## निर्यात केवल 2.2 फीसदी

हमारा देश फलों एवं सब्जियों में विश्व में चीन के बाद दूसरे स्थान पर है. लेकिन इसके बावजूद हमारा वैश्विक निर्यात केवल 2.2 फीसदी है. देश में फूल निर्यात में राज्य की हिस्सेदारी 43 प्रतिशत है. राज्य के कुछ विकसित जिलों से ही फलों का निर्यात किया जाता है. यह निर्यात दूसरी जगह से किया जाना चाहिए. हमारे कृषि उत्पाद मुख्य रूप से यूरोपीय देशों और खाड़ी देशों को निर्यात किये जाते हैं. उन्होंने कहा कि, अगर किसी कारण से इसका असर दक्षिण पूर्व एशियाई देशों पर पड़ता है तो कृषि उत्पादों के निर्यात का विकल्प ढूंढना जरूरी है. उन्होंने यह भी उम्मीद जताई कि संशोधित निर्यात नीति तैयार करने के लिए इस सम्मेलन में विभिन्न मुद्दों पर चर्चा की जानी चाहिए.

## विपणन मंत्री अब्दुल सत्तार का परिषद को संदेश

इस मौके पर विपणन मंत्री अब्दुल सत्तार ने परिषद को शुभकामना संदेश दिया. इसमें उन्होंने कहा कि, कृषि उपज की गुणवत्ता में सुधार के लिए कृषि विपणन बोर्ड के माध्यम से किसानों को बड़े पैमाने पर प्रशिक्षण दिया जा रहा है. किसानों, कृषि उत्पादन कंपनियों के प्रतिनिधियों, निर्यातकों की कड़ी मेहनत के माध्यम से विपणन बोर्ड लगातार यह सुनिश्चित करने का प्रयास कर रहा है कि कृषि उत्पादों को वैश्विक बाजार मिले. यह नये निर्यातक तैयार कर रहा है.फलों, सब्जियों और फूलों के निर्यात के लिए आयातक देशों की मांग के अनुसार वाशी में विशेष प्रसंस्करण सुविधाएं स्थापित की गई हैं.

Pune Edition Edition
Aug 25, 2024 Page No. 6
Powered by: erelego.com

Dt. 24/08/2024

पुण्य नगरी

# उत्पन्नवाढीसाठी शेतमाल निर्यात पायाभूत सुविधा शासन पुरविणार

## अपर मुख्य सचिव अनुप कुमार यांचे प्रतिपादन



पुणे : राज्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी कृषी निर्यात हा सर्वोत्तम पर्याय असून, यासाठी पायाभूत सुविधा, क्लस्टर, शीतगृहे तसेच वाहतूक व्यवस्थेच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व सुविधा पणन मंडळ आणि मॅग्नेट प्रकल्पाच्या समन्वयातून पुरविण्यात येतील, असे प्रतिपादन सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार यांनी केले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने यशदा येथे आयोजित फळे, भाजीपाला व फुले निर्यात परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या वेळी उद्योग विभागाचे विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह, अपेडाचे प्रादेशिक प्रमुख प्रशांत वाघमारे, परकीय व्यापार महासंचालनालयाचे उपमहासंचालक दिलीराज दाभोळे, फेडरेशन ऑफ इंडियन एक्सपोर्ट ऑर्गनायझेशनचे क्षेत्रीय प्रमुख ऋषिकांत तिवारी, आरपीक्यूएस मुंबईचे सहसंचालक डॉ. ब्रिजेश मिश्रा, जेएनपीटीचे विश्वनाथ धारट, कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे, कार्यकारी संचालक संजय कदम आदी उपस्थित होते.

अनुप कुमार म्हणाले की, महाराष्ट्र कृषी निर्यातीमध्ये आघाडीवर आहे. राज्यात पहिली कृषी निर्यात परिषद फेब्रुवारी २०२२ मध्ये झाली. या परिषदेत केंद्राच्या कृषी निर्यात धोरण २०१८ वर विचारमंथन करून राज्याचे कृषी निर्यात धोरण २०२१ जाहीर केले होते. याच धोरणात सुधारणा करण्यासाठी या परिषदेचे आयोजन केले आहे. कार्गोचे मार्ग बदलल्याने निर्यात माल पोहोचण्यास १५ ते २७ दिवस लागतात. रशिया आणि युक्रेन युद्ध, बांगलादेशातील राजकीय घडामोडीचा परिणाम निर्यातीवर झाला आहे. त्यावर मार्ग काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

फळे आणि भाजीपालामध्ये जगात चीननंतर आपल्या देशाचा दुसरा क्रमांक लागतो. पण, असे असूनही आपली जागतिक पातळीवर निर्यात फक्त २.२ टक्के आहे. देशात फुलांच्या निर्यातीत राज्याचा ४३ टक्के वाटा आहे. राज्यात फक्त काही विकसित जिल्ह्यांतूनच फळांची निर्यात होते. ही निर्यात इतर ठिकाणाहून झाली पाहिजे. युरोपियन देश, आखाती देशांना प्रामुख्याने आपल्या कृषिमालाची निर्यात होते. काही कारणाने यावर परिणाम झाल्यास आग्नेय आशियायी देशांना कृषिमालाच्या निर्यातीचा पर्याय शोधणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले. सुधारित निर्यात धोरण तयार करण्याच्या दृष्टीने या परिषदेत विविध मुद्द्यांवर चर्चा व्हावी, अशीही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, पणनमंत्री अब्दुल सत्तार यांचा परिषदेस संदेश देत कृषिमालाचा दर्जा वाढावा यासाठी कृषी पणन मंडळामार्फत शेतकऱ्यांना प्रशिक्षित केले जात आहे.

प्रास्ताविकात कदम म्हणाले की, या परिषदेत अपेडा, डीजीएफटी, एनपीपीओ, जेएनपीटी, कॉनकोर, फेडरेशन ऑफ इंडियन एस्पोर्ट ऑर्गनायझेशन तसेच राज्यातील विविध फळे, भाजीपाला व फुलांचे यशस्वी निर्यातदार यांचे मार्गदर्शनदेखील आयोजित करण्यात येणार आहे. पॅकिजिंग, वाहतूक आणि लॉजिस्टिक सुधारण्यासाठी धोरणे याबाबतदेखील चर्चा होणार आहे.

Samana, Dt. 23/08/2024

# कृषिमाल निर्यातीसाठी सुविधा पुरविणार

## पणन विभागाचे मुख्य सचिव अनुप कुमार यांची माहिती

पुणे, दि. २२ (प्रतिनिधी) – राज्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी कृषी निर्यात हा सर्वोत्तम पर्याय असून, यासाठी पायाभूत सुविधा, क्लस्टर, शीतगृहे तसेच वाहतूक व्यवस्थेच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व सुविधा पणन मंडळ आणि मॅग्नेट प्रकल्पाच्या समन्वयातून पुरविण्यात येतील, असे प्रतिपादन सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार यांनी केले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने यशदा येथे आयोजित फळे, भाजीपाला व फुले निर्यात परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उद्योग विभागाचे विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह, अपेडाचे प्रादेशिक प्रमुख प्रशांत वाघमारे, परकीय व्यापार महासंचालनालयाचे उपमहासंचालक दिलीपराज दाभोळे, फेडरेशन ऑफ इंडियन एक्सपोर्ट ऑर्गनायझेशनचे क्षेत्रीय प्रमुख ऋषिकांत तिवारी, आरपीक्यूएस मुंबईचे सहसंचालक डॉ. ब्रिजेश मिश्रा, जेएनपीटीचे विश्वनाथ धारट, कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे, कार्यकारी संचालक संजय कदम आदी उपस्थित होते.

अनुप कुमार म्हणाले, कार्गोचे मार्ग बदलल्याने निर्यात माल पोहोचण्यास १५ ते २७ दिवस लागतात. रशिया आणि युक्रेन युद्ध, बांगलादेशातील राजकीय घडामोडीचा परिणाम निर्यातीवर झाला आहे. त्यावर मार्ग काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

या परिषदेत अपेडा, डीजीएफटी, एनपीपीओ, जेएनपीटी, कॉनकोर, फेडरेशन ऑफ इंडियन एस्पोर्ट ऑर्गनायझेशन तसेच राज्यातील विविध फळे, भाजीपाला व फुलांचे यशस्वी निर्यातदार यांचे मार्गदर्शनदेखील आयोजित करण्यात येणार आहे.

Sakal, Dt. 23/08/2024

# कृषिमाल निर्यातीचा पर्याय शोधणे आवश्यक

## अनुप कुमार : फळे, भाजीपाला व फुले निर्यात परिषदेचे उद्‍घाटन

**मार्केट यार्ड, ता. २२ :** "युरोपियन व आखाती देशांना प्रामुख्याने आपल्या कृषिमालाची निर्यात मोठ्या प्रमाणावर होते. काही कारणाने यावर परिणाम झाल्यास अन्य आशियायी देशांना कृषिमालाच्या निर्यातीचा पर्याय शोधणे आवश्यक आहे. सुधारित निर्यात धोरण तयार करण्यासाठी या परिषदेत विविध मुद्द्यांवर चर्चा व्हावी", अशी अपेक्षा सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने यशदा येथे आयोजित फळे, भाजीपाला व फुले निर्यात परिषदेच्या उद्‍घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उद्योग विभागाचे विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह, अपेडाचे प्रादेशिक प्रमुख प्रशांत वाघमारे, परकीय व्यापार महासंचालनालयाचे उपमहासंचालक दिलीपराज दाभोळे, फेडरेशन ऑफ इंडियन एक्स्पोर्ट ऑर्गनायझेशनचे क्षेत्रीय प्रमुख ऋषिकांत तिवारी, आरपीक्यूएस मुंबईचे सहसंचालक डॉ. ब्रिजेश मिश्रा, जेएनपीटीचे विश्वनाथ धारट, कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे, कार्यकारी संचालक संजय कदम आदी उपस्थित होते.



**यशदा, पुणे :** राज्य कृषी पणन मंडळाच्या निर्यात परिषदेचे उद्‍घाटन अनुप कुमार यांचे हस्ते झाले. यावेळी विविध मान्यवर.

> "जागतिक घडामोडींमुळे कार्गोचे मार्ग बदलल्याने निर्यात माल पोहचण्यास १५ ते २७ दिवस लागतात. रशिया आणि युक्रेन युद्ध, बांगला देशातील राजकीय घडामोडींचा परिणाम निर्यातीवर झाला आहे. त्यावर मार्ग काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.
>
> **- अनुप कुमार,** अपर मुख्य सचिव, सहकार व पणन, महाराष्ट्र राज्य.

अनुप कुमार म्हणाले, "राज्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी कृषी निर्यात हा सर्वोत्तम पर्याय असून यासाठी पायाभूत सुविधा, क्लस्टर, शीतगृहे तसेच वाहतूक व्यवस्थेच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व सुविधा पणन मंडळ आणि मॅग्नेट प्रकल्पाच्या समन्वयातून पुरविण्यात येतील. फळे आणि भाजीपाल्यामध्ये जगात चीननंतर आपल्या देशाचा दुसरा क्रमांक लागतो. आपली जागतिक पातळीवर निर्यात फक्त २.२ टक्के आहे. देशात फुलांच्या निर्यातीत राज्याचा ४३ टक्के वाटा आहे. राज्यात फक्त काही विकसित जिल्ह्यांतूनच फळांची निर्यात होते. ही निर्यात इतर ठिकाणांहूनही झाली पाहिजे." प्रास्ताविक संजय कदम यांनी केले.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

पुढारी ANCHOR

# शेतमाल निर्यातीसाठी पायाभूत सुविधा वाढविणार

- अपर मुख्य सचिव अनुप कुमार यांची ग्वाही
- फळे, भाजीपाला, फुले शेतमाल निर्यात परिषद संपन्न



दीपप्रज्वलनाने निर्यात परिषदेचे उद्घाटन करताना अनुप कुमार. समवेत विनायक कोकरे, संजय कदम, दीपेंद्र सिंह कुशवाह व मान्यवर.

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

देशात फलोत्पादनात महाराष्ट्र राज्य प्रमुख निर्यातदार असून भारतातून होणाऱ्या एकूण शेतमाल निर्यातीत महाराष्ट्राचा ४३ टक्क्यांइतका वाटा आहे. महाराष्ट्रातून १७ हजार कोटींचा शेतमाल निर्यात होत असून एकूणच शेतमाल निर्यात वाढीसाठी पायाभूत सुविधा, क्लस्टर, शीतगृहांची उपलब्धता या सर्व सुविधा राज्य कृषी पणन मंडळ आणि मॅग्नेट प्रकल्पाच्या समन्वयातून पुरविण्यात येतील, अशी ग्वाही राज्याचे सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार यांनी दिली.

पर्यायी शेतमाल निर्यात बाजारपेठ शोधण्यासाठीही प्राधान्य दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि महाराष्ट्र अ‍ॅग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पाच्या संयुक्त विद्यमाने यशदा येथे गुरुवारी (दि.२२) दिवसभर फळे, भाजीपाला व फुले निर्यात परिषद झाली. त्याचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. त्यानंतर ते बोलत होते. यावेळी राज्याचे उद्योग विभागाचे विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह, अपेडाचे प्रादेशिक प्रमुख प्रशांत वाघमारे, परकीय व्यापार महासंचालनालयाचे उपमहासंचालक दिलीराज दाभोळे, फेडरेशन ऑफ इंडियन एक्सपोर्ट ऑर्गनायझेशनचे क्षेत्रीय प्रमुख ऋषिकांत तिवारी, आरपीक्यूएस मुंबईचे सहसंचालक डॉ. ब्रिजेश मिश्रा, जेएनपीटीचे विश्वनाथ धारट, कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे, कार्यकारी संचालक संजय कदम आदी उपस्थित होते.

## सुधारित धोरण करणार

राज्याचे कृषी निर्यात धोरण २०२१ जाहीर केले होते. याच धोरणात सुधारणा करण्यासाठी या परिषदेचे आयोजन केले आहे. राज्यात फक्त काही विकसित जिल्ह्यातूनच फळांची निर्यात होते. ही निर्यात इतर ठिकाणाहून झाली पाहिजे. युरोपियन देश, आखाती देशांना प्रामुख्याने आपल्या कृषीमालाची निर्यात होते. काही कारणाने यावर परिणाम झाल्यास अग्नेय आशियायी देशांना कृषीमालाच्या निर्यातीचा पर्याय शोधणे आवश्यक आहे. त्यासाठी सुधारित निर्यात धोरण तयार केल्याचेही यावेळी अनुप कुमार यांनी स्पष्ट केले.

पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी प्रास्तविक केले. तर सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी आभार मानले.

My Pune Edition Edition
Aug 23, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

Kesari, Dt. 23/08/2024

# 'शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीच्या दृष्टीने शेतमाल निर्यातीसाठी पायाभूत सुविधा शासन पुरविणार'

**पुणे :** राज्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी कृषी निर्यात हा सर्वोत्तम पर्याय असून यासाठी पायाभूत सुविधा, क्लस्टर, शीतगृहे तसेच वाहतूक व्यवस्थेच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व सुविधा पणन मंडळ आणि मॅग्नेट प्रकल्पाच्या समन्वयातून पुरविण्यात येतील, असे प्रतिपादन सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार यांनी केले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि महाराष्ट्र ग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने यशदा येथे आयोजित फळे, भाजीपाला व फुले निर्यात परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी उद्योग विभागाचे विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह, अपेडाचे प्रादेशिक प्रमुख प्रशांत वाघमारे, परकीय व्यापार महासंचालनालयाचे उपमहासंचालक दिलीराज दाभोळे, फेडरेशन ऑफ इंडियन एक्सपोर्ट ऑर्गनायझेशनचे क्षेत्रीय प्रमुख ऋषिकांत तिवारी, आरपीक्यूएस मुंबईचे सहसंचालक डॉ. ब्रिजेश मिश्रा, जेएनपीटीचे विश्वनाथ धारट, कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे, कार्यकारी संचालक संजय कदम आदी उपस्थित होते.

अनुप कुमार म्हणाले, महाराष्ट्र कृषी निर्यातीमध्ये आघाडीवर आहे. राज्यात पहिली कृषी निर्यात परिषद फेब्रुवारी २०२२ मध्ये झाली. प्रास्ताविकात कदम यांनी सांगितले, या परिषदेत अपेडा, डीजीएफटी, एनपीपीओ, जेएनपीटी, कॉनकोर, फेडरेशन ऑफ इंडियन एस्पोर्ट ऑर्गनायझेशन तसेच राज्यातील विविध फळे, भाजीपाला व फुलाचे यशस्वी निर्यातदार यांचे मार्गदर्शनदेखील आयोजित करण्यात येणार आहे. पॅकेजिंग, वाहतूक आणि लॉजिस्टिक सुधारण्यासाठी धोरणे याबाबतदेखील चर्चा होणार आहे.

Agrowon, Dt. 23/08/2024

# शेतकऱ्यांनाच निर्यातदार करण्यासाठी प्रयत्नशील

## मुख्य सचिव अनूपकुमार : फळे, भाजीपाला-फुले निर्यात परिषद

ॲग्रोवन वृत्तसेवा

**पुणे** : जगात फळे, भाजीपाला उत्पादनामध्ये चीननंतर भारताचा समावेश आहे. मात्र निर्यातीमध्ये भारत पहिल्या १० देशांमध्ये देखील नाही. भारतापेक्षा लहान देश शेतीमाल निर्यातीमध्ये आघाडीवर आहेत. मात्र भारताचा विचार केला तर महाराष्ट्र फळे, भाजीपाला, फुले निर्यातीसाठी आघाडीवर असून, देशातील शेतीमालाच्या निर्यातीमध्ये महाराष्ट्राचा वाटा ४३ टक्के एवढा आहे. हा टक्का वाढविण्यासाठी थेट शेतकरी निर्यातदार व्हावा, आणि यासाठी दक्षिण पूर्व आशिया देशांची पर्यायी बाजारपेठ शोधण्याची गरज आहे. यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन सहकार व पणन विभागाचे मुख्य सचिव अनूपकुमार यांनी केले.

महाराष्ट्र कृषी पणन मंडळ आणि महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पाच्या वतीने यशदामध्ये गुरुवारी (ता. २२) आयोजित फळे भाजीपाला व फुले निर्यात परिषदेमध्ये अनूपकुमार बोलत होते. या वेळी उद्योग मंत्रालयातील निर्यात आयुक्त दीपेंद्र सिंह कुशावत, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, 'मॅग्नेट'चे प्रकल्प संचालक विनायक कोकरे, सहसंचालक अमोल यादव, कंटेनर कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे मुंबई क्लस्टर प्रमुख नर्मदेश्वर झा, 'अपेडा'चे पश्चिम विभागाचे प्रादेशिक प्रमुख प्रशांत वाघमारे, 'डीजीएफटी'चे उपमहासंचालक दिलीराज दाभोळे, 'आरपीक्यूएस'चे सहसंचालक डॉ. ब्रिजेश मिश्रा इंडियन एक्सपोर्ट संघटनेचे ऋषिकांत तिवारी, जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टचे विश्वनाथ धारट आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी विविध तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पणन मंडळाच्या निर्यात विभागाचे उपसरव्यवस्थापक सतीश वराडे यांनी केले. 'मॅग्नेट'चे प्रकल्प संचालकविनायक कोकरे यांनी आभार मानले.




**पुणे : महाराष्ट्र कृषी पणन मंडळ आणि महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पाच्या वतीने गुरुवारी (ता. २२) आयोजित 'फळे, भाजीपाला व फुले निर्यात' परिषदेचे उद्घाटन सहकार व पणन सचिव अनूपकुमार यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. या वेळी निर्यात क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित होते.**

### युद्धजन्य परिस्थिती; अशांतता निर्यातीस बाधक

जागतिक युद्धजन्य परिस्थिती आणि अशांततेचा फटका शेतीमाल निर्यातीस बसत आहे. युक्रेन आणि रशिया यांचे गेले अनेक दिवस सुरू असलेले युद्ध आणि बांगलादेशातील राजकीय अस्थिरतेचा फटका भारतीय शेतीमाल निर्यातीला फटका बसला आहे. युक्रेनच्या युद्धामुळे अनेक सागरी मार्ग बंद झाल्याने दुसऱ्या मार्गांचा अवलंब करावा लागला. यामुळे वाहतुकीचे दिवस आणि खर्च वाढल्याने आयातदार देशांना आणि खरेदीदारांना भारतीय शेतीमाल महागात पडू लागल्याने आपली निर्यात कमी झाल्याचेही अनूपकुमार यांनी सांगितले.

### कांदा निर्यात धोरणात १० वर्षांत १२ वेळा बदल

कांद्याच्या निर्यात धोरणातील गेल्या १० वर्षांत १२ वेळा बदल करावा लागल्याने जागतिक पातळीवर कांदा निर्यातीत निराशाजनक चित्र राहिले आहे. मात्र जागतिक पातळीवर नाशिकसारख्या लाल कांद्याला चवीमुळे प्रचंड मागणी असून, देखील कांदा निर्यात धोरणातील बदलांबाबत नाराजी पणन सचिव अनूपकुमार यांनी व्यक्त केली.

### पणनमंत्री अनुपस्थित, शुभेच्छा संदेशाचे वाचन

पणनमंत्री अब्दुल सत्तार यांच्या पुढाकारातून आयोजित केलेल्या निर्यात परिषदेला स्वतः पणनमंत्रीच अनुपस्थित होते. या परिषदेसाठी त्यांनी पाठविलेला शुभेच्छा संदेशात ते म्हणाले, ''अतिरेकी आयातीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर ताण येत आहे. यामुळे भारताला निर्यातीसाठी स्पर्धा करावी लागत आहे. या स्पर्धेचा अभ्यास करणे आवश्यक असून, जास्तीत जास्त शेतकरी निर्यातदार व्हावा यासाठी प्रयत्न सुरू आहेत. हॉलंड देशातील जागतिक फुलबाजाराची पाहणी केल्यानंतर भारतातील आणि विशेषतः महाराष्ट्रातील फुलांची निर्यात वाढीसाठी तळेगाव दाभाडे येथे आंतरराष्ट्रीय फुलबाजार सुविधा उभारण्याची प्रक्रिया सुरू आहे.''

Punyanagari, Dt. 22/08/2024

# फळे, भाजीपाला व फुले निर्यात आज परिषद

। **पुणे** : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने फळे, भाजीपाला व फुले निर्यात परिषदेचे उद्या (गुरुवार, दि. २२ ऑगस्ट) यशदा येथे आयोजन करण्यात आले आहे. पणन मंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन होणार असून, या वेळी सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार, अपेडाचे प्रादेशिक प्रमुख प्रशांत वाघमारे, परकीय व्यापार महासंचालनालयाचे उपमहासंचालक दिलीराज दाभोळे, फेडरेशन ऑफ इंडियन एक्सपोर्ट ऑर्गनायझेशनचे क्षेत्रीय प्रमुख ऋषिकांत तिवारी, आरपीक्यूएस मुंबईचे सहसंचालक डॉ. ब्रिजेश मिश्रा आदी उपस्थित राहणार आहेत.

Maharashtra Times, Dt. 22/08/2024

# फळे, भाजीपाला निर्यात परिषद आज पुण्यात

## 'यशदा'मध्ये पणन मंत्री अब्दुल सत्तार करणार उद्घाटन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने आज, गुरुवारी (२२ ऑगस्ट) फळे, भाजीपाला व फुले निर्यात परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. 'यशदा' येथे सकाळी साडेदहा वाजता परिषद होणार आहे.

पणन मंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होणार असून, सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव अनुपकुमार, कृषी आणि प्रक्रियाकृत अन्न उत्पादन निर्यात विकास प्राधिकरणाचे (अपेडा) प्रादेशिक प्रमुख प्रशांत वाघमारे, परकीय व्यापार महासंचालनालयाचे उपमहासंचालक दिलीराज दाभोळे, फेडरेशन ऑफ इंडियन एक्सपोर्ट ऑर्गनायझेशनचे क्षेत्रीय प्रमुख ऋषीकांत तिवारी, 'आरपीक्यूएस मुंबई'चे सहसंचालक डॉ. ब्रिजेश मिश्रा उपस्थित राहणार आहेत. राज्यातील विविध फळे, भाजीपाला व फुलांचे यशस्वी निर्यातदार या वेळी मार्गदर्शन करणार आहे. पॅकेजिंग, वाहतूक आणि लॉजिस्टिक सुधारण्यासाठी धोरणे याबाबतदेखील चर्चा होणार आहे.

सरकारच्या कृषीमाल विषयक विविध विभागांच्या योजना, त्यांचे निकष, जागतिक बाजारातील ट्रेंड, गुणवत्ता मानके आणि निर्यातविषयक नियमांची माहिती देण्यात येणार आहे. निर्यातदार व निर्यात बाजारातील अन्य प्रमुख घटकांचादेखील या वेळी एकमेकांशी संवाद होणार आहे. त्यामुळे परिषद राज्यातून फळे, भाजीपाला व फुलांच्या निर्यातीवृद्धीकरिता उपयुक्त ठरणार आहे, अशी माहिती कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम आणि 'मॅग्नेट'चे प्रकल्प संचालक विनायक कोकरे यांनी दिली.

Loksatta, Dt. 22/08/24

# 'यशदा'मध्ये आज कृषी निर्यात परिषद

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषी, पणन मंडळ, आशियाई विकास बँक सहाय्यित मॅग्नेट प्रकल्पाच्या संयुक्त विद्यमाने आज, २२ ऑगस्ट रोजी यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) येथे कृषी निर्यात परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी साडेदहा वाजता पणनमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते, सहकार व पणन विभागाचे सचिव अनुप कुमार यांच्या उपस्थितीत या परिषदेचे उद्घाटन होणार आहे. जागतिक बाजारात राज्यातून फळे, फुलांसह विविध शेतीमाल आणि प्रक्रियायुक्त पदार्थांची निर्यात होते. जागतिक बाजारातील निकष सतत बदल असतात. त्यामुळे निर्यातीत अडथळे येत असतात. त्यावर तोडगा काढण्यासाठी, शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि निर्यातदारांना मार्गदर्शन करण्यासाठी या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

लोकमत

# यशदात आज भाजीपाला, फुले, फळे निर्यात परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि महाराष्ट्र अॅग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने फळे, भाजीपाला व फुले निर्यात परिषदेचे येत्या गुरुवारी (दि. २२) यशदा येथे आयोजन करण्यात आले आहे.

पणनमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन होणार असून, यावेळी सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार, अपेडाचे प्रादेशिक प्रमुख प्रशांत वाघमारे, परकीय व्यापार महासंचालनालय उपमहासंचालक दिलीपराज दाभोळे, 'फेडरेशन ऑफ इंडियन एक्स्पोर्ट'चे क्षेत्रीय प्रमुख ऋषिकांत तिवारी, आरपीक्यूएस मुंबईचे सहसंचालक डॉ. ब्रिजेश मिश्रा उपस्थित राहणार आहेत.

या परिषदेत अपेडा, डीजीएफटी, एनपीपीओ, जेएनपीटी, कॉनकोर, फेडरेशन ऑफ इंडियन एस्पोर्ट ऑर्गनायझेशन, तसेच राज्यातील विविध फळे, भाजीपाला व फुलाचे यशस्वी निर्यातदार यांचे मार्गदर्शनदेखील आयोजित करण्यात येणार आहे. पॅकेजिंग, वाहतूक आणि लॉजिस्टिक सुधारण्यासाठी धोरणे याबाबतदेखील चर्चा होणार आहे.

या परिषदेतून शासनाच्या कृषीमाल विषयक विविध विभागांच्या योजना, त्यांचे निकष, जागतिक बाजारातील ट्रेंड, गुणवत्ता मानके आणि निर्यातविषयक नियमांची माहिती उपस्थितांना होणार आहे.

Tarun Bharat, Date 21/08/2024

# 'फळे, भाजीपाला व फुले निर्यात परिषदे'चे आयोजन

**पुणे :** महाराष्ट्र राज्य हे कृषी मालाच्या उत्पादन व निर्यातीमध्ये अग्रगण्य राज्य आहे. विविध फळे, भाजीपाला व इतर कृषी मालाचेदेखील गुणवत्तापूर्ण उत्पादन राज्यांमध्ये होत असते. राज्यामधे आंबा, केळी, द्राक्षे, डाळिंब आणि संत्री ही फळे मोठ्या प्रमाणात उत्पादित होतात. यांबरोबरच सिताफळ, पेरु, चिकू, मोसंबी, स्ट्रॉबेरी, अंजीर याही फळांची मोठ्या प्रमाणामध्ये व्यावसायिक शेती होत असून त्यांच्याही निर्यातीकरिता मागणी वाढत चालली आहे. आमच्या भाज्या, कांद्यापासून टोमॅटोपर्यंत, हिरवी मिरची, भेंडी जगभरातील स्वयंपाकघरातील मुख्य पदार्थ आहेत. याव्यतिरिक्त, आमचा फ्लोरिकल्चर उद्योग, गुलाब, जरबेरा आणि कार्नेशन यांनाही निर्यातीमध्ये मोठी मागणी आहे. या सर्व पिकांच्या निर्यातवृद्धीकरिता प्रशिक्षण व पायाभूत सुविधा इ.मध्ये 'कृषी पणन मंडळ' महत्त्वाची भूमिका बजावत आहे. यशदा येथे होणाऱ्या या परिषदेचे उद्घाटन गुरुवार, दि. २२ ऑगस्ट रोजी रोजी मंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमास अपर मुख्य सचिव अनुप कुमार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहेत.

सकाळ
बुधवार, २१ ऑगस्ट २०२४

# पणन मंडळातर्फे उद्या निर्यात परिषद

मार्केट यार्ड, ता. २० : कृषी मालाच्या उत्पादन आणि निर्यातीमध्ये महाराष्ट्र हे अग्रगण्य राज्य आहे. राज्यात नवनवीन निर्यातदार तयार होणे. स्वतः शेतकरी आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांचा निर्यातीमध्ये सहभाग वाढविण्याच्या अनुषंगाने राज्य कृषी पणन मंडळ आणि आशियायी विकास बँक सहाय्यित मॅग्नेट प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (ता. २२) फळे, भाजीपाला व फुले निर्यात परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. यशदा येथील एमडीसी सभागृहात ही परिषद पार पडणार आहे. निर्यात परिषदेचे उद्घाटन राज्याचे पणन मंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते होणार आहे. सहकार व पणनचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. परिषदेस शेतकरी, शेतकरी उत्पादन कंपन्यांचे प्रतिनिधी, निर्यातदार, अधिकारी, कृषिमाल निर्यात उद्योगातील तज्ज्ञ यांना एकत्रित आणणे हा या परिषदेचा उद्देश आहे. या परिषदेमध्ये अपेडा, डी.जी.एफ.टी., एन.पी.पी.ओ., फेडरेशन ऑफ इंडियन एक्स्पोर्ट ऑर्गनायझेशन तसेच राज्यातील विविध फळे, भाजीपाला व फुलांचे निर्यातदार यांचे मार्गदर्शनदेखील आयोजित करण्यात येणार आहे.

सकाळ

## पणन मंडळातर्फे उद्या निर्यात परिषद

मार्केट यार्ड, ता. २० : कृषी मालाच्या उत्पादन आणि निर्यातीमध्ये महाराष्ट्र हे अग्रगण्य राज्य आहे. राज्यात नवनवीन निर्यातदार तयार होणे. स्वतः शेतकरी आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांचा निर्यातीमध्ये सहभाग वाढविण्याच्या अनुषंगाने राज्य कृषी पणन मंडळ आणि आशियायी विकास बँक सहाय्यित मॅग्नेट प्रकल्प यांच्या वतीने गुरुवारी (ता. २२) फळे, भाजीपाला व फुले निर्यात परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. यशदा येथील एमडीसी सभागृहात ही परिषद होणार आहे.

निर्यात परिषदेचे उद्घाटन राज्याचे पणन मंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते होणार आहे. सहकार व पणनचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. परिषदेस शेतकरी, शेतकरी उत्पादन कंपन्यांचे प्रतिनिधी, निर्यातदार, अधिकारी, कृषिमाल निर्यात उद्योगातील तज्ज्ञ यांना एकत्रित आणणे हा या परिषदेचा उद्देश आहे. या परिषदेमध्ये अपेडा, डी.जी.एफ.टी., एन.पी.पी.ओ., फेडरेशन ऑफ इंडियन एक्स्पोर्ट ऑर्गनायझेशन तसेच राज्यातील विविध फळे, भाजीपाला व फुलांचे निर्यातदार यांचे मार्गदर्शनदेखील आयोजित करण्यात येणार आहे.

पान २ वर >

Pune, Pune-Today
21/08/2024 Page No. 1

सकाळ

## पणन मंडळातर्फे उद्या निर्यात परिषद

परिषदेमध्ये पॅकिजिंग, वाहतूक आणि लॉजिस्टिक सुधारण्यासाठी धोरणे याबाबत देखील चर्चा होणार आहे. या परिषदेमधून शासनाच्या कृषिमाल संदर्भात विविध विभागांच्या योजना, त्यांचे निकष, जागतिक बाजारातील ट्रेंड, गुणवत्ता मानके आणि निर्यातविषयक नियमांची माहिती देखील उपस्थितांना होणार आहे. निर्यातदार व निर्यात बाजारातील इतर प्रमुख घटकांचा देखील एकमेकांशी संपर्क येणार असल्यामुळे ही परिषद फळे, भाजीपाला व फुलांच्या निर्यातवृद्धीकरिता उपयुक्त ठरणार असल्याची माहिती कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

Pune, Pune-Today
21/08/2024 Page No. 2

Punyanagari, Dt.21/08/24

# फळपीक उत्पादन, निर्यात प्रशिक्षणाचा लाभ घ्या!

**पुणे** : देशात महाराष्ट्र फळे व भाजीपाल्याच्या उत्पादन आणि निर्यातीत आघाडीवर आहे. मात्र, काढणीपश्चात तंत्रज्ञानाच्या अभावामुळे नुकसान मोठ्या प्रमाणावर होत आहे. हे नुकसान टाळून जास्तीत जास्त शेतीमाल निर्यात होऊन, मूल्यसाखळी विकसित होण्यासाठी मॅग्नेट प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांनी विविध फळपिकांच्या उत्पादन ते निर्यात प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागीय प्रकल्प संचालक राजेंद्र महाजन यांनी केले. आशियायी विकास बँक अर्थसाह्यित ॲग्री बिझनेस नेटवर्क प्रकल्पांतर्गत (मॅग्नेट) वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार प्रशिक्षण संस्थेत, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाच्या वतीने आंबा, काजू, पडवळ व चिकू या पिकांचे काढणीपश्चात तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते; त्या वेळी महाजन बोलत होते. या वेळी वैकुंठ मेहता संस्थेच्या संचालिका डॉ. हेमा यादव, सहकार विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मंगेश तिटकारे, महाव्यवस्थापक संजयकुमार सुद्रिक उपस्थित होते. महाजन म्हणाले की, कीड, रोग व विषमुक्त शेतीमालाची मागणी वाढत आहे. यासाठी लागवडीपासूनच कीड-रोग आणि कीटकनाशके फवारणीचे व्यवस्थापन आवश्यक आहे. निर्यात आणि देशांतर्गत बाजारपेठेतील मागणीनुसार फळे व भाजीपाला पिकामध्ये शेतकऱ्यांनी काढणीपश्चात तंत्रज्ञानाचा अवलंब करणे गरजेचे आहे. यासाठीच मॅग्नेट प्रकल्प राबविण्यात येत असून, या अंतर्गत नव्याने उभ्या करावयाच्या विविध निर्यात सुविधा केंद्रांच्या शेतकरी उत्पादक कंपनी व शेतकऱ्यांनी फायदा घ्यावा, यासाठी या प्रकल्पांतर्गत ६० टक्के अनुदानाची तरतूद आहे, असे त्यांनी सांगितले. डॉ. हेमा यादव म्हणाल्या की, शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांची संघटन शक्ती निर्माण करणे व त्यामध्ये महिलांचा सहभाग वाढविणे हे कृषी क्षेत्राच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. हेमंत जगताप यांनी सूत्रसंचालन केले. दिगंबर साबळे यांनी प्रास्ताविक केले.

Pudhari, Dt 21/08/2024

# शहरात उद्या फळे, भाजीपाला व फुले निर्यात परिषद

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व आशियाई विकास बँक सहाय्यित मॅग्नेट प्रकल्प याच्या संयुक्त विद्यमाने यशदा येथे गुरुवारी (दि. २२ ऑगस्ट) निमंत्रितांसाठी फळे, भाजीपाला व फुले निर्यात परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

या परिषदेचे उद्घाटन राज्याचे पणन व अल्पसंख्याकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते होत आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार उपस्थित असणार आहेत. सदर परिषदेस शेतकरी, शेतकरी उत्पादन कंपन्यांचे प्रतिनिधी, निर्यातदार, संबंधित विभागाचे अधिकारी, कृषीमाल निर्यात उद्योगातील विविध संस्था व तज्ज्ञ यांना एकत्रित आणणे हा या परिषदेचा महत्त्वाचा उद्देश आहे.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व आशियाई विकास बँक सहाय्यित मॅग्रेट प्रकल्पाच्या परिषदेमध्ये अपेडा, डी. जी. एफ. टी., एन. पी. पी. ओ., जे.एन.पी.टी. कॉनकोर, फेडरेशन ऑफ इंडियन एस्पोर्ट ऑर्गनायझेशन तसेच राज्यातील विविध फळे, भाजीपाला व फुलाचे यशस्वी निर्यातदार यांचे मार्गदर्शनदेखील आयोजित करण्यात येणार आहे. परिषदेमध्ये पॅकेजिंग, वाहतूक आणि लॉजिस्टिक सुधारण्यासाठी धोरणे याबाबत देखील चर्चा होणार आहे. या परिषदेमधून शासनाच्या कृषीमाल संदर्भित विविध विभागांच्या योजना, त्यांचे निकष, जागतिक बाजारातील ट्रेंड, गुणवत्ता मानके आणि निर्यातविषयक नियमांची माहिती देखील यावेळी उपस्थितांना होणार आहे. तसेच या सदर परिषदेमधून निर्यातदार व निर्यात बाजारातील इतर प्रमुख घटकांचा देखील एकमेकांशी संपर्क येणार असल्यामुळे ही परिषद राज्यातून फळे, भाजीपाला व फुलांच्या निर्यातीवृद्धीकरिता अतिशय उपयुक्त ठरणार असल्याची माहिती कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी यावेळी उपस्थितांना दिली.

लोकमत

# बांगलादेशात झाली संत्र्याची निर्यात उत्पादकांना फटका, व्यापारीच मालामाल

## ४९.७६ कोटींचा प्रस्ताव : आयात शुल्क दरवाढीच्या ५० टक्के अनुदान शासन देणार

**अमरावती :** जिल्ह्यात संत्रा हे प्रमुख फळपीक आहे व संत्र्यांची निर्यात बांगलादेश, भूतान, नेपाळ आणि मध्यपूर्वेतील देशांमध्ये केली जाते. त्यातही जिल्ह्यातील निर्यातक्षम संत्रा हा बांगलादेशात पाठविण्यात येतो. मात्र, बांगलादेशाने भारतामधील संत्र्यावर आयात शुल्क ८८ रुपयांपर्यंत वाढविल्यामुळे निर्यात कमी होऊन भाव पडले. याचा थेट फटका संत्रा उत्पादकांना बसला आहे.

संत्रा मातीमोल झाल्याने उत्पादकांचे करोडोंचे नुकसान झाले. त्यामुळे शासनाने ७ डिसेंबर २०२३ च्या शासनादेशाद्वारे राज्यातून बांगलादेशात निर्यात होणाऱ्या संत्राकरिता आयात शुल्काच्या ५० टक्के रक्कम देण्याचा निर्णय जाहीर केला. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक कार्यालयाद्वारे शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, सहकार प्रक्रिया संस्था व निर्यातदार यांच्याकडून प्रस्ताव मागविले. यामध्ये वरूड, कोलकाता, मध्य प्रदेशातील ३७ निर्यातदारांचे प्रस्ताव प्राप्त झाले. या निर्यातदारांद्वारे ५०२ शेतकऱ्यांचा संत्रा बांगलादेशात पाठविला होता. यासाठी ४९.७६ कोटींचा प्रस्ताव जिल्हा उपनिबंधकांद्वारे पणन संचालकांना पाठविलेला आहे. ज्या शेतकऱ्यांचा संत्रा व्यापाऱ्यांनी खरेदी केला, त्यांना फारसा फायदा झाला नाही.

> शासनादेशानुसार अनुदानासाठी प्रस्ताव मागविण्यात आले होते. तपासणीअंती ३८ प्रस्ताव पणन संचालकांकडे पाठविले आहे.
>
> **- शंकर कुंभार**, जिल्हा उपनिबंधक

> पहिलेच व्यापारी फिरकलेच नाही. संत्रा झाडावर खराब होत असल्याने कमी विकावा लागला, आता अनुदान व्यापाऱ्यांनाच मिळण्याची शक्यता आहे.
>
> **रवींद्र देशमुख**, संत्रा उत्पादक

### अशी झाली बांगलादेशात संत्राची निर्यात

बांगलादेश ही राज्यातील संत्राची सर्वात मोठी बाजारपेठ आहे व राज्यातील सर्वाधिक संत्रा उत्पादन अमरावती जिल्ह्यात होते. यामध्ये २०२१ मध्ये संत्राच्या निर्यातीपैकी ८७ टक्के तर २०२२-२३ मध्ये ८६ टक्के निर्यात बांगलादेशात झालेली आहे. २०२१ मधील १,४१,२६३ टनांवरुन निर्यात कमी होऊन २०२२-२३ मध्ये ६३,१५३ टनांवर पोहोचली आहे.



### पाच देशांत केली जाते निर्यात

देशातील संत्राची निर्यात बांगलादेश, भूतान, नेपाळ आणि मध्यपूर्वेतील देशांमध्ये केली जाते. त्यातही जिल्ह्यातील निर्यातक्षम संत्रा हा बांगलादेशात पाठविण्यात येतो. जिल्ह्यातील संत्राचा प्रमुख निर्यातदार बांगलादेश देश आहे.

### संत्रा लागवडीचे क्षेत्र (हेक्टरमध्ये)

| | |
|---|---|
| अमरावती | १,४५५ |
| भातकुली | ५० |
| नांदगाव | १,८३२ |
| चांदूर रेल्वे | २,३५१ |
| धामणगाव | १,०६३ |
| मोर्शी | ११,४२५ |
| वरुड | २१,३४६ |
| चांदूरबा. | ११,३९६ |
| तिवसा | ३,०७५ |
| अचलपूर | ११,२९७ |
| अंजनगाव | ५,४३४ |
| दर्यापूर | ०६ |
| धारणी | ३२ |
| चिखलदरा | ७५ |
| एकूण | ७०,८३६ |

Agrowon, Dt. 21/08/2024

# कृषी निर्यात कार्यशाळेचे 'यशदा'मध्ये उद्या आयोजन

## पणन मंडळ, 'मॅग्नेट'चा सहभाग; पणनमंत्री करणार उद्‍घाटन

**अ‍ॅग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि 'मॅग्नेट' प्रकल्पाच्या वतीने गुरुवारी (ता. २२) फळे, भाजीपाला आणि फुले निर्यात परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेचे उद्‍घाटन पणनमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते सकाळी साडेनऊ वाजता 'यशदा' येथे होणार आहे, अशी माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम आणि मॅग्नेटचे प्रकल्प संचालक विनायक कोकरे यांनी दिली.

या बाबतची माहिती देताना कदम म्हणाले, की महाराष्ट्रातून जास्तीत जास्त शेतीमाल निर्यात व्हावा, यासाठी पणन मंडळ आणि महाराष्ट्र अ‍ॅग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पाच्या माध्यमातून विविध पिकांच्या लागवडी ते निर्यात या विविध टप्प्यांवर शेतकरी आणि गटांना मार्गदर्शन करण्यात येत आहे. तसेच शेतीमालाच्या मूल्यवर्धनासाठी देखील पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. याद्वारे शेतकरी उत्पादक कंपन्यांना प्रोत्साहित केले जात आहे. या सर्व शेतकऱ्यांना शेतीमाल निर्यातीमधील अधिक संधी उपलब्ध व्हावी, यासाठी निर्यात परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

या परिषदेला पणन सचिव अनुपकुमार, 'डीजीएफटी'चे महासंचालक दिलीराज दाभोळे, 'अपेडा'चे प्रादेशिक प्रमुख प्रशांत वाघमारे, निर्यात संघटनेचे ऋषिकांत तिवारी, 'आयपीक्यूएस'चे डॉ. ब्रिजेश मिश्रा यांच्यासह शेतीमाल निर्यात क्षेत्रातील विविध मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत.

पुण्य नगरी

# पोलंड चाखणार पुरंदरच्या अंजीर ज्यूसची चव

**मुंबई** : कृषी उत्पादन निर्यात विकास प्राधिकरणाने (अपेडा) भारतातील पहिलेच रेडी टू ड्रिंक अर्थात तयार पेय असलेल्या अंजिराच्या ज्यूसची पहिली खेप पोलंडला रवाना केली आहे. हे ज्यूस जीआय मानांकित पुरंदरच्या अंजिरांपासून तयार करण्यात आले आहे. अपेडाचे अध्यक्ष अजिंक्य देव यांनी जर्मनीमधील हॉलंडमार्गे जाणाऱ्या या ज्यूसच्या पहिल्या ऐतिहासिक शिपमेंटला सर्व भागधारकांच्या उपस्थितीत हिरवा झेंडा दाखवला. या शिपमेंटमुळे जागतिक स्तरावर भारताच्या अद्वितीय कृषी उत्पादनांना चालना देण्यात एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला गेला आहे.

नवी दिल्लीमधील ग्रेटर

## देशातील पहिल्याच रेडी टू ड्रिंकची पहिली खेप रवाना



नोएडा येथील अपेडाच्या दालनात आयोजित करण्यात आलेल्या सियाल २०२३ या कार्यक्रमात अतिशय नाविन्यपूर्ण अशा अंजीर ज्यूसच्या निर्मितीचा प्रवास सुरू झाला. या वेळी उपलब्ध आंतरराष्ट्रीय व्यापार संधींमुळे या उत्पादनाला जागतिक बाजारपेठेत प्राथमिक प्रवेश करण्याचा मार्ग मिळाला. पुरंदर हायलँड्स फार्मर्स प्रोड्युसर कंपनीने तयार केलेल्या अंजिराच्या ज्यूसने या समारंभात सर्वांचे लक्ष तर वेधून घेतलेच, शिवाय पुरस्कारदेखील मिळवला आणि आंतरराष्ट्रीय बाजारातदेखील तयारीनिशी उतरण्याची क्षमता सिद्ध केली.

या उत्पादनाचा विकास आणि निर्यातीसाठी अपेडाचा सातत्यपूर्ण पाठिंबा आणि सहाय्य महत्त्वपूर्ण ठरले आहे. २०२२ मध्ये हॅम्बर्गला केलेल्या पुरंदरच्या जीआय मानांकित ताज्या अंजिराच्या पहिल्या निर्यातीनंतर अपेडाने या अल्पभूधारक शेतकऱ्यांसोबत कायम संपर्क ठेवून काम केले आहे. या उत्पादनाला तात्पुरते पेटंट मिळाले आहे.

इटलीतील रिमिनी येथे मॅकफ्रूट प्रदर्शनामध्ये अपेडाच्या सहाय्याने अंजिराचा रस ठेवण्यात आला होता आणि त्याचा जागतिक स्तरावर आणखी विस्तार केला गेला. या उपक्रमाला खरेदीदारांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. पोलंडमधील व्रोक्लॉ येथील एमजी सेल्स एसपीने याबाबत चौकशी केली, ज्यामुळे ही महत्त्वपूर्ण निर्यात शक्य झाली. या उल्लेखनीय कामगिरीमुळे भारतीय कृषी उत्पादनातील क्षमतेचे दर्शन घडतेच, शिवाय कृषी निर्यातीच्या मूल्यवर्धनामध्ये संशोधन आणि विकास यांचे महत्त्वही अधोरेखित होते.

Mumbai Edition
Aug 20, 2024 Page No. 10
Powered by: erelego.com

# अन्य मालाप्रमाणे कांद्यावरही मिळणार तारण कर्ज; राज्यातील पहिला प्रकल्प

## कृषी महाकिसान संघ घेणार शेतकऱ्यांची हमी, चेअरमन लोखंडे यांची घोषणा

प्रतिनिधी | श्रीरामपूर

आतापर्यंत शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या भुसार मालाला शेतमाल तारण योजनेमार्फत कर्ज उपलब्ध होत असे. आजपर्यंत कांद्याला मालतारण सुविधा उपलब्ध नव्हती. मात्र, ज्या शेतकऱ्यांकडे कांदा साठवण्याची सुविधा नाही, तो कांदा महाकिसान संघ वेअर हाऊस (चाळी) मध्ये ठेवून त्यावर शेतकऱ्यांना बँकांकडून कांदा मालतारण सुविधा उपलब्ध करून देऊन शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे महाकिसान संघ नोडल एजन्सीचे चेअरमन प्रशांत लोखंडे यांनी जाहीर केले.

श्रीरामपूर तालुक्यातील उंदिरगाव येथे आयोजित कार्यक्रमात शेतकऱ्यांशी संवाद साधताना प्रशांत लोखंडे बोलतहोते. यावेळी दिलीप गलांडे, प्रकाश ताके, मच्छिंद्र बांद्रे, शितल गलांडे,विलास आढाव आदी शेतकरी उपस्थित होते. हमीभाव खरेदीमध्ये शेतकऱ्यांची होणारी ओढाताण कमी करण्यासाठी महाकिसान संघाने स्वतःचे पोर्टल आणि ॲप विकसित केले आहे. आपल्या भागामध्ये मोठ्या प्रमाणावर कांद्याचे उत्पादन होते. मात्र, कांदा काढल्यानंतर लगेच त्याला योग्य तो दर मिळत नाही. म्हणून शेतकरी आपल्या छोट्या- मोठ्या चाळीत कांद्याची साठवणूक करतो. मात्र, जास्त उत्पादन झाल्याने तयार केलेली चाळ पुरत नाही. तसेच शेतकऱ्यांचे खताचे, बियाणाचे असे छोटे-मोठे देणे असल्याने नाईलाजाने शेतकऱ्यांना तो कांदा कवडीमोल भावामध्ये विकावा लागतो. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. हे नुकसान आता टळणार आहे.

### गावागावात कांदा गोडावून उभारण्यात येणार

ग्रामीण भागात जागोजागी कांदा साठवणुकीसाठी गोडावूनउभारण्यात येणार आहेत. तेथे शेतकऱ्यांनी पिकवलेला कांदा ठेवण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. तो कांदा शेतकऱ्याच्या मालकीचा राहणार असून ज्या शेतकऱ्यांना पैशांची गरज असेल,त्यांच्यासाठी कांदा तारण योजना राबवून त्यासाठी लागणारी बँकांची हमी महाकिसान संघ घेणार आहे. यामुळे साठवणुकीचीअडचण राहणार नसून ज्यावेळी चांगला भाव येईल, त्यावेळी शेतकरी कांदा विकू शकेल, असे लोखंडे यांनी जाहीर केले.

### कांदा तारण सुविधा प्रथमच मिळणार

यापूर्वी गहू, ज्वारी, सोयाबीन, हरभरा व इतर धान्य गोदामामध्ये साठवून शेतमाल तारण योजनेअंतर्गत कर्ज मिळत होते. मात्र कांदा साठवून कर्ज मिळण्याची सुविधा उपलब्ध नव्हती. आता मात्र लोखंडे यांची ही योजना यशस्वी झाली, तर कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. नाशिकनंतर अहमदनगर जिल्ह्यात सर्वाधिक कांदा पिकवला जातो. त्यामुळे जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा होणार आहे.

अॅग्रोवन

# फळपीक उत्पादन, निर्यात प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा

## विभागीय प्रकल्प संचालक राजेंद्र महाजन यांचे आवाहन

**अॅग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : देशात महाराष्ट्र फळे व भाजीपाल्याच्या उत्पादन आणि निर्यातीत आघाडीवर आहे. मात्र काढणीपश्चात तंत्रज्ञानाच्या अभावामुळे नुकसान मोठ्या प्रमाणावर होत आहे. हे नुकसान टाळून जास्तीत जास्त शेतीमाल निर्यात होऊन, मूल्यसाखळी विकसित होण्यासाठी मॅग्नेट प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांनी विविध फळपिकांच्या उत्पादन ते निर्यात प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागीय प्रकल्प संचालक राजेंद्र महाजन यांनी केले.

आशियायी विकास बँक अर्थसाह्यित अॅग्री बिझनेस नेटवर्क प्रकल्पाअंतर्गत (मॅग्नेट) वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार प्रशिक्षण संस्थेत, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाच्या वतीने आंबा, काजू, पडवळ व चिकू या पिकाचे काढणी पश्चात तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी महाजन बोलत होते. या वेळी वैकुंठ मेहता संस्थेच्या संचालिका डॉ. हेमा यादव, सहकार विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मंगेश तिटकारे, महाव्यवस्थापक संजयकुमार सुद्रीक उपस्थित होते.

या वेळी महाजन म्हणाले, की कीड, रोग व विषमुक्त शेतीमालाची मागणी वाढत आहे. यासाठी लागवडीपासूनच कीड-रोग आणि कीटकनाशके फवारणीचे व्यवस्थापन आवश्यक आहे. निर्यात आणि देशांतर्गत बाजारपेठेतील मागणीनुसार फळे व भाजीपाला पिकामध्ये शेतकऱ्यांची काढणीपश्चात तंत्रज्ञानाचा अवलंब करणे गरजेचे आहे. यासाठीच मॅग्नेट प्रकल्प राबविण्यात येत असून, या अंतर्गत नव्याने उभ्या करावयाच्या विविध निर्यात सुविधा केंद्रांच्या शेतकरी उत्पादक कंपनी व शेतकऱ्यांनी फायदा घ्यावा, यासाठी या प्रकल्पअंतर्गत ६० टक्के अनुदानाची तरतूद आहे. डॉ. हेमा यादव म्हणाल्या, की शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांची संघटन शक्ती निर्माण करणे व त्यामध्ये महिलांचा सहभाग वाढविणे हे कृषी क्षेत्राच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे आहे. सूत्रसंचालन हेमंत जगताप यांनी केले. प्रास्ताविक दिगंबर साबळे यांनी केले.



**पुणे : मॅग्नेट प्रकल्पांतर्गत आयोजित प्रशिक्षण कार्यशाळेत मार्गदर्शन करताना विभागीय प्रकल्प संचालक राजेंद्र महाजन.**

Agrowon, Date 18/08/2024

# पुरंदरच्या अंजीर ज्यूसची पोलंडला निर्यात

## पुरंदर हायलॅण्ड्स शेतकरी कंपनीच्या भरारीची जागतिक दखल

ॲग्रोवन वृत्तसेवा

**पुणे : अंजिरासारख्या दुर्लक्षित फळपिकाला प्रक्रियेच्या माध्यमातून सातासमुद्रापार नेऊन निर्यातीची नवी कवाडे उघडण्याचा उल्लेखनीय प्रयत्न पुणे जिल्ह्यातील पुरंदर हायलॅण्ड्स शेतकरी उत्पादक कंपनीने केला आहे. 'रेडी टू ड्रिंक' स्वरूपातील स्वयंसंशोधित 'अंजीर ज्यूस'ची पहिली खेप या कंपनीने युरोपातील पोलंडला रवाना केली आहे. 'जीआय'प्राप्त पुरंदर अंजीराला प्रक्रियेच्या माध्यमातून नवी संधी मिळत असून, या निर्यातीमुळे जागतिक स्तरावर भारताच्या अद्वितीय कृषी उत्पादनांना चालना देण्यात एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला असल्याचे 'अपेडा' या केंद्रीय संस्थेने म्हटले आहे.**

याबाबत माहिती देताना कंपनीचे अध्यक्ष रोहन उरसळ म्हणाले, "पुरंदरच्या भौगोलिक निर्देशांक मिळालेल्या अंजिराच्या ज्यूसची पोलंडला पहिल्यांदाच निर्यात करण्याच्या प्रयत्नांना शेतकऱ्यांना यश आले आहे. पुरंदर हायलॅण्ड्स शेतकरी उत्पादक कंपनीच्या वतीने ही निर्यात करण्यात आली असून, पोलंडच्या बाजारपेठेतील ग्राहकांचा प्रतिसाद पाहून पुढील निर्यातवृद्धी होण्याची आम्हाला आशा आहे."

पान ४ वर »




### अंजीर ज्यूससह, जांभूळ, पेरू ज्यूसचा समावेश

अंजीर ज्यूससह जांभूळ आणि पेरूचा ज्यूस देखील चाचणीसाठी पाठविण्यात आला आहे. जांभूळ आणि पेरू ज्यूसची चव स्थानिक ग्राहकांना आवडल्यानंतर त्यांच्या प्रतिक्रियेनंतर निर्यात वाढविणार असल्याचे उरसळ यांनी सांगितले.

# 'पुरंदर अंजीर'च्या ज्यूसची पोलंडला निर्यात

» पान १ वरून

२०२२ मध्ये हॅम्बर्ग (जर्मनी) येथे 'पुरंदर अंजिरा'च्या पहिल्या ताज्या फळांच्या निर्यातीनंतर हायलॅण्ड्स शेतकरी उत्पादक कंपनीचा उत्साह वाढला होता. इटलीतील रिमिनी येथे 'मॅकफ्रूट २०२४' या प्रदर्शनामध्ये 'पुरंदर अंजीर'चा ज्यूस सादर करण्यात आला. यास खरेदीदारांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. पोलंडमधील व्रोक्लॉ येथील 'एमजी सेल्स एसपी' वितरक कंपनीने या उत्पादनाबाबत उत्सुकता दाखविली होती, या कंपनीमुळे ही महत्त्वपूर्ण निर्यात शक्य झाल्याचे 'अपेडा'ने म्हटले आहे.

गेल्या तीन-चार वर्षांच्या प्रयत्नांमधून अंजीर ज्यूसची निर्मिती करण्यात आल्याचे कंपनी अध्यक्ष श्री. उरसळ यांनी सांगितले. ते म्हणाले, "अंजीर ज्यूसचे उत्पादन घेताना, प्राथमिक पातळीवर काही चाचण्या घेऊन, उत्पादन सुरू केले. या ज्यूसची स्थानिक पातळीवरील ग्राहकांकडून प्रतिसाद घेतल्यानंतर ज्यूस पुणे, मुंबई येथील ग्राहकांना पाठविण्यात आला. यानंतर काही निर्यातदारांशी चर्चा करून, पोलंड येथे काही बाटल्या पाठविण्यात आल्या होत्या. त्याचे सकारात्मक परिणाम आल्यानंतर निर्यातदार सीऑन यांच्या सहकार्याने २०० मिलिमीटरच्या १ हजार १०० बॉटल निर्यात करण्यात आल्या. पोलंड येथे एमजी सेल्स हे वितरक असून, ते त्यांच्या लेबलने तिथे ज्यूसची विक्री करणार आहेत."

### जागतिक बाजारपेठेत दखल...

पुरंदर हायलॅण्ड्स शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना २०२१मध्ये १४ शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन केली होती. तालुक्यातील अंजीर उत्पादक शेतकऱ्यांना विविध निर्यातक्षम वाण उपलब्ध व्हावे, अंजिराला परदेशी बाजारपेठ मिळावी हा कंपनीच्या स्थापनेमागील उद्देश होता. कंपनीद्वारे शेतकऱ्यांना लागवड ते निर्यात अशा सर्व पातळीवर व्यवस्थापन तज्ज्ञांच्या माध्यमातून मार्गदर्शन केले जाते. मात्र केवळ उत्पादन न करता, मूल्यवर्धनासाठी प्रक्रियादेखील महत्त्वाची आहे. पल्प आणि फोडी या प्राथमिक प्रक्रियेपासून सुरुवात केलेल्या या कंपनीने अंजीर आणि सीताफळापासून नावीन्यपूर्ण उत्पादने संशोधित केली आहेत. यापुढे जात कंपनीने अंजिरासारख्या बिनरसाच्या फळाचा ज्यूस तयार करून मूल्यवर्धानात एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. शेतकरी उत्पादक कंपनीने उत्पादनाचा दर्जा राखत 'पुरंदर अंजीर'च्या ताज्या फळांनीही जागतिक बाजारपेठेत आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

'पूना फिग' (पुणे अंजीर) म्हणून प्रसिद्ध असलेल्या या वाणाचे पुरंदर तालुक्यात (जि. पुणे) उत्पादन घेतले जाते. अनुकूल भौगोलिक वातावरण व वैशिष्ट्यपूर्ण स्वाद, रंग, चवीमुळे यास 'पुरंदर अंजीर' म्हणून भौगोलिक निर्देशांक (जीआय) मिळाले आहे. या ज्यूसला तात्पुरते पेटंट देण्यात आल्याचे वाणिज्य मंत्रालयाने म्हटले आहे.

पुण्य नगरी

# पणन मंडळ पुण्यात उभारणार आंतरराष्ट्रीय फूल बाजार

**पुणे** : फूल उत्पादनाचे क्लस्टर निर्माण झालेल्या मावळ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या फूल निर्यातीला आता बूस्टर मिळणार आहे. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ तळेगाव दाभाडे येथे आंतरराष्ट्रीय फूल बाजार उभारणार आहे. यासाठी 'अपेडा'ने तत्त्वतः मंजुरी दिली असून, अंतिम प्रकल्प अहवाल सादर करण्याच्या सूचना पणन मंडळाला दिल्या आहेत.

मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम म्हणाले, पणन मंडळाच्या वतीने फ्लोरिकल्चरला प्रोत्साहन दिले जात आहे. यासाठी पणन मंडळ आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने तळेगाव येथे फ्लोरिकल्चर पार्क उभारण्यात आले आहे. तर, मावळ तालुक्यातदेखील फ्लोरिकल्चर रुजले असून, मावळ तालुका आणि तळेगाव दाभाडे हे त्याचे हब झाले आहेत. फ्लोरिकल्चरमधील सातत्याने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाचा फायदा शेतकऱ्यांना व्हावा, या उद्देशाने इंडो डच सहकार्याने राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेत स्वयंचलित एक्सलन्स इन फ्लोरिकल्चर सेंटरदेखील उभारण्यात आले आहे. याचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे.

शेतकरी आणि निर्यातदारांची अत्याधुनिक लिलाव केंद्राची मागणी होती. याबाबत फ्रान्सच्या मझार या कंपनीकडून आंतरराष्ट्रीय बाजार उभारणीबाबत प्रकल्प अहवाल बनवून घेतला. या अहवालात राज्यातील कट आणि लूज फूल उत्पादनाचा आढावा घेत पाच एकर क्षेत्रावर फूल बाजाराचा प्रकल्प सादर केला आहे. आता हा प्रकल्प साकारत असल्याचे समाधान आहे. याचा फायदा पुणे जिल्ह्यासह सांगली, सातारा, सोलापूर, कोल्हापूर आदी जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांना होईल. देशभरातील निर्यातदार येथून [illegible] तळेगाव दाभाडे फ्लोरिकल्चर पार्क फूल उत्पादक सहकारी संस्थेचे सचिव मल्हारराव ढोले यांनी सांगितले.

याबाबत पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम म्हणाले की, नेदरलँड देश फूल उत्पादनासाठी अग्रेसर आहे. अल्समीर हा आंतरराष्ट्रीय फूल बाजार प्रसिद्ध आहे. याच धर्तीवर कार्यप्रणाली असणारा तळेगाव येथील आंतरराष्ट्रीय फूल बाजार आहे. या ठिकाणावरून दररोज पाच लाख फुलांची हाताळणी आणि निर्यात होईल. यासाठी सुमारे २५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, १०० टक्के अर्थसाह्य 'अपेडा'चे असेल.


## PUBLIC NOTICE
**(By Email/Courier/Registered A.D. Post/Hand Delivery)**

Notice is hereby given that owner of Property more particularly described in schedule hereunder 1) Mrs. Rakhi Tarun Mishra and 2) Late Mr. Tarun Mishra, Both R/at:- E-41, Taps 3&4 Township, Boisar, Palghar Thane - 401504, are negotiating for its sale in favour of my client, if anybody has any right, title, interest, or claim of whatsoever nature on the said property, is requested to intimate the undersigned in writing at address given below, together with documentary proof thereof within 7 days from publication of this notice, failing which, it will be deemed that title of the said property is clear and marketable and there are no other claims to the said property or that the same have been waived. SCHEDULE : Flat No. 306 on the Third floor, of A Building, in "Kohinoor Ambrosia", and in the "M/S Kohinoor Properties", Survey No. 73/332 to 73/339, Village:- Hadapsar, Tal:- Haveli, Dist:- Pune.

Date : 14 Aug 2024 Sd/-

**Adv. Suraj Jadhav & Associates**
**Office : 205, Ashoka Pavilion, Dr. Baba Saheb Ambedkar Rd, Nr Collector Off, Camp, Pune-411 001. Mob:- 9028423178/9860907357 Office :**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही **विद्यमान मालक श्री. सागर शिवाजीराव भोसले** रा - स. नं. ३११, रोड नं. ७, सुर्यमुखी गणेश मंदिरा जवळ, ससाणे नगर, हडपसर, ता. हवेली, जि. पुणे. ४११०२८ यांचे मालकी व प्रत्यक्ष ताबे वहिवाटीची असून सदरील मिळकत आमचे अशिल मोहन गौराप्पा गुरव आणि बी. के. सुमीता गौराप्पा गुरव यांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरील मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहीत आहे. तरी सदर मिळकतीमध्ये कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध असल्यास त्यांनी तो **खालील पत्त्यावर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसाचे आत** संबंधित कागदपत्रे व पुराव्यासह आमचेकडे लेखी हरकत कळवून पोहच घ्यावी. अन्यथा सदरचे मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहीत आहे आणि ज्या कोणाचा काही हक्क, अधिकार हितसंबंध असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर आलेल्या कोणाचीही कसलीही हरकत विचारात

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत **सौ. शरयु दळवी गायकवाड** यांची मालकी वहिवाटीची असून सदर मिळकतीचे संधरबात त्यांची आमचे अशिल अब्दुर रहमान यांचे बरोबर बोलणी चालू आहेत त्यांनी आमच्या आशीलांना भरोसा दिला की सदर मिळकत कधीही कोणालाही विकलेली नाही अथवा सदर मिळकती बाबत कधीही हक्कसोडपत्र, साठेखत, गहाणखत, विसार पावती, तबदिल पत्र, अदलाबदल दस्त, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, कुलमुखत्यार पत्र केलेले नाही व नव्हते. तरी सदर मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, लीन, चोळीबांगडी, करार-मदार इत्यादी कोणत्याही मार्गे कसलाही हक्क हितसंबंध अधिकार असल्यास अशा व्यक्तींनी प्रस्तुतची नोटिस प्रसिद्ध झाल्या पासून **१० दिवसात** अस्सल कागदपत्रांनिशी आमची तशी खात्री पटवून द्यावी अन्यथा सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असुन सदर मिळकतीत अन्य कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध अधिकार नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे, असे गृहीत धरले जाईल व मग कोणाचीही कसलीही तक्रार

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की खालील परिशिष्टातील वर्णन केलेली मिळकत ही **कै. आप्पा संभाजी कसबे (मयत तर्फे वारस) १) श्री. मयुर आप्पा कसबे, २) श्रीमती लक्ष्मी आप्पा कसबे, ३) रोहित आप्पा कसबे,** रा. स. नं. २१५ गंगानगर, फुरसुंगी, पुणे ४१२३०८, व **४) सौ. प्रिया शाम बोरात (लग्नानंतरचे नाव) प्रिया आप्पा कसबे (लग्नापूर्वीचे नाव),** रा. स. नं. १२/१/२ फॉर्चून ईस्ट सोसायटी, फ्लॅट नं. ६०३/६०४ बी ४, एसबीआई समोर, खराडी, पुणे ४११०१४. यांच्या मालकीची असून विद्यमान मालक व आमचे अशिल यांचेमध्ये सदर मिळकतीसंदर्भात विक्री व्यवहाराची बोलणी चालू आहेत. तसेच सदरील मिळकत ही पूर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा त्यांनी आमचे अशिलांस दिला आहे. सबब, सदर मिळकतीमध्ये कोणाही व्यक्ती, संस्था, बँकेचा काही बोजा या हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी योग्य त्या कागदपत्रांनिशी सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **सात** दिवसाचे आत आमची खात्री करून द्यावी. सदर मुदतीत कोणी काहीही तक्रार न घेतल्यास/केल्यास, सदर मिळकतीमध्ये सदर विद्यमान मालकांचा मालकी हक्क व अधिकार निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आणि ज्या कोणाचा हक्क वा हितसंबंध असेल त्यांनी


Agrowon, Date 12/08/2024

# फळपीक क्लस्टरमधून होणार प्रक्रिया उद्योगांची उभारणी

## मंत्रिमंडळ बैठकीत येणार प्रस्ताव; शेतकरी कंपन्या भाग घेणार

विनोद इंगोले : ॲग्रोवन वृत्तसेवा

अमरावती : प्रक्रियेअभावी राज्यात फळपिकांच्या दरात होणारी पडझड लक्षात घेता फळपीक क्लस्टर योजनेच्या माध्यमातून त्या-त्या पिकांवरील प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. येत्या मंत्रिमंडळ बैठकीत या संबंधीचा प्रस्ताव मांडला जाणार असून, विदर्भाचे मुख्य फळपीक असलेल्या संत्र्यावरील प्रक्रिया उद्योगाचा मार्गही याद्वारे मोकळा होणार आहे.



याबाबतची माहिती आमदार देवेंद्र भुयार यांनी दिली. नागपुरी संत्र्याखालील सर्वाधिक एक लाख हेक्टर क्षेत्र अमरावती जिल्ह्यात आहे. मात्र या भागात त्यावर आधारित प्रक्रिया उद्योगाची वाणवा असल्याने शेतकऱ्यांना अपेक्षित दर मिळत नाही. त्यातच बांगलादेशकडून सातत्याने आयात शुल्कात वाढ होत असल्याने निर्यातीवरही निर्बंध आले आहेत. परिणामी, गेल्या काही वर्षांत संत्रादर दबावात आल्याची स्थिती आहे. संत्र्यावर आधारित एकही प्रक्रिया उद्योग या भागात नाही. त्याचाही फटका संत्रा बागायतदारांना बसला आहे. त्यामुळेच या भागात संत्र्यावर आधारित प्रक्रिया उद्योगाची उभारणी व्हावी, अशी गेल्या अनेक वर्षांची मागणी आहे. फळपीक क्लस्टरच्या माध्यमातून ती येत्या काळात पूर्णत्वास येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्या भागातील फळपिकांवर आधारित प्रक्रिया उद्योगाची उभारणी या क्लस्टरच्या माध्यमातून केली जाईल, अशी माहितीदेखील आमदार भुयार यांनी दिली.

तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ठानाठुनी येथे जैन व कोकाकोला यांच्या संयुक्त सहकार्यातून उभारण्यात येणाऱ्या प्रक्रिया उद्योगाच्या जागेचे भूमिपूजन झाले होते. मात्र हा प्रकल्प पूर्णत्वास गेला नाही. त्यानंतर अनेकदा या भागासाठी प्रक्रिया उद्योगांची घोषणा झाली. निदान या वेळी तरी शासकीय स्तरावरील घोषणेतून प्रक्रिया उद्योग उभा राहत संत्रा उत्पादकांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### आराखडा तयार

फळपीक क्लस्टर योजनेचा आराखडा तयार करण्यात आला असून, येत्या मंत्रिमंडळ बैठकीत त्यास मान्यता देऊन निधी उपलब्ध केला जाणार आहे. ६० टक्के शासकीय अनुदान, ३० टक्के बँक हमी व १० टक्के शेतकरी कंपनीचा हिस्सा याप्रमाणे निधी उपलब्धता होईल. शेतकरी कंपनीच्या माध्यमातून हा प्रकल्प चालविण्यात येणार असून, याला कृषी विभागाच्या सूत्रांनी देखील दुजोरा दिला आहे.

“क्लस्टरच्या माध्यमातून त्या त्या भागात संबंधित फळपिकांच्या प्रक्रियेला प्रोत्साहन दिले जाणार आहे. अमरावती जिल्ह्यात संत्र्यावर आधारित प्रक्रिया उद्योगाची उभारणी होईल. आंबिया आणि मृग बहर याप्रमाणे एक हंगाम अडीच महिन्यांचा त्यानुसार पाच महिनेच प्रक्रिया उद्योग चालणार आहे. परिणामी याची व्यवहार्यता नसल्याचे सांगण्यात आले होते. सुधारित प्रस्तावाअंती प्रक्रिया उद्योगाला येत्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता मिळणार आहे. याकरिता सातत्याने पाठपुरावा केला.

**– देवेंद्र भुयार,**
आमदार, वरुड-मोर्शी, जि. अमरावती.

# 'सोलापूर अनारदाना'चे आज लोकार्पण

**ॲग्रोवन वृत्तसेवा**



**डाळिंबाचे 'सोलापूर अनारदाना' वाण.**

सोलापूर : सोलापुरातील राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राने संशोधित केलेल्या डाळिंबाच्या नव्या 'सोलापूर अनारदाना' या वाणाचे आज (ता.११) नवी दिल्ली येथील भारतीय कृषी संशोधन संस्थेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण होईल.

या कार्यक्रमात भारतीय कृषी संशोधन संस्थेअंतर्गत देशभरात कार्यरत विविध संशोधन संस्थांनी विकसित केलेली विविध फळे आणि पिकांची १०९ वाणे प्रसारित केली जाणार आहेत. त्यात महाराष्ट्रातील 'सोलापूर अनारदाना' या वाणाचा समावेश आहे.

नवी दिल्ली येथील संशोधन केंद्राच्या पुसा येथील 'आयएआरए'च्या प्रक्षेत्रात आज सकाळी अकरा वाजता हा कार्यक्रम होईल. संपूर्ण देशात डाळिंब प्रक्रियेसाठी शिफारस करण्यात येणारे हे पहिलेच वाण आहे. सध्याच्या स्थितीत अनारदाना तयार करण्यासाठी डाळिंबाच्या 'नाना' या जंगली जातीचा वापर करण्यात येतो. परंतु त्याची तयार अनारदाण्याची रिकव्हरी अत्यंत कमी आहे. ही बाब विचारात घेऊन संशोधन केंद्राने 'सोलापूर अनारदाना' हे खास प्रक्रियेसाठी उपयुक्त ठरणारे पहिले डाळिंबाचे वाण संशोधित केले. संशोधन केंद्राचे मुख्य शास्त्रज्ञ डॉ. दिनेश बाबू यांनी त्यासाठी योगदान दिले. गेल्या काही वर्षांपासून त्यावर काम सुरू होते. दोन वर्षांपूर्वी ते प्रायोगिक स्वरूपात त्याची प्रात्यक्षिकेही घेतली आहेत. महाराष्ट्रासह शेजारील राज्यांच्या कोरड्या, अर्ध-कोरड्या प्रदेशांसाठी ते फायदेशीर ठरेल.

> सोलापूर अनारदाना हे वाण आमच्यासह शेतकऱ्यांसाठी डाळिंबाच्या शेतीत प्रगतिपथावरील एक मोठे आश्‍वासक पाऊल आहे. हवामान बदलामुळे निर्माण झालेल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या हे वाण फायदेशीर ठरणार आहेच, पण प्रक्रिया उद्योगातही सोलापूर अनारदाना हे वाण उच्च-गुणवत्तेच्या उत्पादनात एक नवा मापदंड निर्माण करेल.
> – **डॉ. राजीव मराठे,** केंद्र संचालक, राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर

### 'सोलापूर अनारदाना'ची गुणवैशिष्ट्ये

- उच्च-गुणवत्तेच्या अनारदाना (सुके डाळिंबाचे बी) उत्पादनासाठी हे वाण फायदेशीर.
- मऊ बियांमुळे, गडद लाल दाण्यांमुळे आणि उच्च रसामुळे त्याला विशिष्ठ ओळख.
- फळे मध्यम ते मोठ्या आकाराची मिळतात, ज्याचे वजन सुमारे २५० ते ३०० ग्रॅमपर्यंत राहते.
- प्रत्येक झाडामध्ये दरवर्षी सरासरी १८ ते २० किलो उत्पादन हमखास होते.
- या दाण्यांचा स्वाद गोड-आंबट आहे, ज्यामुळे ताजे सेवन, अनारदानामध्ये प्रक्रियेसाठी उपयुक्त ठरते.

Agrowon, Date 11/08/2024

Agrowon, Date 10/08/2024

# पणन मंडळ पुण्यात उभारणार आंतरराष्ट्रीय फुलबाजार

## 'अपेडा'ची तत्त्वतः मंजुरी; अंतिम प्रकल्प अहवाल होणार सादर

**गणेश कोरे : ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : फूल उत्पादनाचे क्लस्टर निर्माण झालेल्या मावळ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या फूल निर्यातीला आता बूस्टर मिळणार आहे. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ तळेगाव दाभाडे येथे आंतरराष्ट्रीय फुलबाजार उभारणार आहे. यासाठी 'अपेडा'ने तत्त्वतः मंजुरी दिली असून, अंतिम प्रकल्प अहवाल सादर करण्याच्या सूचना पणन मंडळाला दिल्या आहेत.

मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम म्हणाले, "पणन मंडळाच्या वतीने फ्लोरिकल्चरला प्रोत्साहन दिले जात आहे. यासाठी पणन मंडळ आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने तळेगाव फ्लोरिक्चर पार्क उभारण्यात आले आहे. तर मावळ तालुक्यात देखील फ्लोरिकल्चर रुजले असून, मावळ तालुका आणि तळेगाव दाभाडे हे त्याचे हब झाले आहेत. फ्लोरिकल्चरमधील सातत्याने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाचा फायदा शेतकऱ्यांना व्हावा, या उद्देशाने इंडो डच सहकार्याने राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेत स्वयंचलित 'एक्सलन्स इन फ्लोरिकल्चर सेंटर देखील उभारण्यात आले आहे. याचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे. शेतकरी आणि निर्यातदारांची अत्याधुनिक लिलाव केंद्राची मागणी होती. याबाबत फ्रान्सच्या मझार या कंपनीकडून आंतरराष्ट्रीय बाजार उभारणी बाबत प्रकल्प अहवाल बनवून घेतला. या अहवालात राज्यातील कट, आणि लूज फूल उत्पादनाचा आढावा घेत ५ एकर क्षेत्रावर फुलबाजाराचा प्रकल्प सादर केला आहे."

आता हा प्रकल्प साकारत असल्याचे समाधान आहे. याचा फायदा पुणे जिल्ह्यासह सांगली, सातारा, सोलापूर, कोल्हापूर आदी जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांना होईल. देशभरातील निर्यातदार येथून थेट खरेदी करू शकतील, असे तळेगाव दाभाडे फ्लोरिकल्चर पार्क फूल उत्पादक सहकारी संस्थेचे सचिव मल्हारराव ढोले यांनी सांगितले.

**नेदरलँड देश फूल उत्पादनासाठी अग्रेसर आहे. अल्समीर हा आंतरराष्ट्रीय फुलबाजार प्रसिद्ध आहे. याच धर्तीवर कार्यप्रणाली असणारा तळेगाव येथील आंतरराष्ट्रीय फुलबाजार आहे. या ठिकाणावरून दररोज ५ लाख फुलांची हाताळणी आणि निर्यात होईल. यासाठी सुमारे २५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, १०० टक्के अर्थसाह्य 'अपेडा'चे असेल.**

**– संजय कदम**, कार्यकारी संचालक, पणन मंडळ, पुणे



पुणे : मॅग्नेट प्रकल्पाची आढावा बैठक 'एडीबी'चे वरिष्ठ संचालक क्युंगफेंग झँग यांच्या उपस्थितीत झाली. या वेळी सहकार पणन विभागाचे सचिव अनुपकुमार यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.

# 'मॅग्नेट' प्रकल्पांतर्गत 'एडीबी' शिष्टमंडळाचा दौरा

ॲग्रोवन वृत्तसेवा

पुणे : "फळे व भाजीपाल्याच्या निर्यातीसाठी महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प महत्त्वाचा असून, प्रकल्प उभारणीदरम्यान आशियायी विकास बँकेचे (एडीबी) पर्यावरणीय व सामाजिक निकष पूर्तता होत आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रकल्प योग्य रीतीने कार्यान्वित होत असल्याचे समाधान आहे," असे मत 'एडीबी'चे वरिष्ठ संचालक क्युंगफेंग झँग यांच्यासह शिष्टमंडळाने व्यक्त केले.

राज्यातील फलोत्पादन पिकांच्या मूल्यवर्धनासाठी लागवड ते निर्यातीसाठी 'एडीबी'च्या अर्थसाह्याने राबविण्यात येत असलेल्या 'मॅग्नेट' प्रकल्पाच्या मूल्यमापन आणि कामकाज आढाव्यासाठी शिष्टमंडळाने दोन दिवस विविध प्रकल्पांना भेटी देऊन आढावा घेतला. शिष्टमंडळामध्ये भारतातील मुख्यालयाच्या प्रमुख मिओ ओका, यास्मिन सिद्दीकी, ताकेशी युएडा, अलेक्सिया मायकेल्स, नारायण अय्यर, विकास गोयल, कृष्णन रौटेला, राघवेंद्र एन. यांचा समावेश होता. बैठकीला 'मॅग्नेट'चे अध्यक्ष अनुपकुमार, प्रकल्प संचालक विनायक कोकरे आदी उपस्थित होते.

अनुपकुमार यांनी महाराष्ट्राच्या फलोत्पादन मूल्यसाखळी विकासासाठी कार्यरत मॅग्नेट प्रकल्पाची प्रगती व भविष्यातील नियोजन याबाबत शिष्टमंडळास माहिती दिली. अनुपकुमार म्हणाले, "फलोत्पादन क्षेत्र व उत्पादनामध्ये महाराष्ट्र देशातील अग्रेसर राज्य आहे. तसेच राज्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने फलोत्पादन क्षेत्राचा विकास ही महत्त्वाची बाब आहे. राज्यातील फलोत्पादन क्षेत्रातील कृषी व्यवसायाला चालना देण्याकरिता मॅग्नेट प्रकल्प महत्त्वाचे काम करत आहे."

दरम्यान, शिष्टमंडळाने वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन (व्हॅमनिकॉम) संस्थेच भागधारकांसोबत चर्चा केली. या वेळी प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान आलेले अनुभव, लाभार्थ्यांच्या सूचनांवर चर्चा करून प्रकल्पाच्या कालमर्यादेत प्रकल्प पूर्ण करावेत, अशी सूचना क्युंगफेंग झँग यांनी केली. शिष्टमंडळाचे भेटीदरम्यान प्रकल्प संचालक विनायक कोकरे, अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव यांनी विविध माहितीचे सादरीकरण केले.

### 'मॅग्नेट'मध्ये या पिकांचा समावेश

डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरू, चिकू, स्ट्रॉबेरी, भेंडी, मिरची (हिरवी व लाल), आंबा, काजू, पडवळ, लिंबू व फुलपिके या फलोत्पादन पिकांचा समावेश आहे.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# प्रक्रिया पदार्थांच्या निर्यातीत महाराष्ट्र अग्रेसर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

देशात फळे, भाजीपाला व त्यापासून प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांच्या निर्यातीत महाराष्ट्र राज्य अग्रेसर असल्याची माहिती राज्याच्या कृषी विभागाचे फलोत्पादन संचालक डॉ. कैलास मोते यांनी दिली. तरीसुध्दा राज्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी अपेडाच्या हॉर्टिनेट प्रणालीवर नोंदणी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

राज्याचा कृषी विभाग, केंद्राच्या अपेडा या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने यशदा येथे नुकत्याच आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात ते बोलत होते. शेतमाल निर्यातदार, निर्यातयोग्य शेतमाल उत्पादन करणाऱ्या पुणे, अहमदनगर व सोलापूरसह अन्य जिल्ह्यांतील शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या खरेदीदार-विक्रेता संवाद व प्रशिक्षण कार्यक्रमात २२५ शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे प्रास्तविक पुणे विभागीय कृषी सहसंचालक रफिक नाईकवडी, अपेडाचे मुंबई कार्यालयाचे उपमहाव्यवस्थापक प्रशांत वाघमारे आदींनी माहिती दिली. यशदाचे महासंचालक शेखर गायकवाड यांनी आपल्या खुमासदार शैलीत शेतीसंदर्भातील प्रश्नांवर उपस्थित शेतकऱ्यांशी संवाद साधून मार्गदर्शन केले. निर्यातयोग्य शेतमाल उत्पादन, निर्यातदार होण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, निर्यातीमधील उपलब्ध संधी, शासनामार्फत निर्यातीला चालना देण्यासाठी उभारण्यात आलेल्या सोयी-सुविधा तसेच निर्यात वाढविण्याच्या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या योजना, बँकिंग क्षेत्रातील निर्यातीच्या दृष्टीने देण्यात येणाऱ्या सेवा, शेतमाल उर्वरित अंश तपासणी प्रयोगशाळेबाबत या वेळी मार्गदर्शन करण्यात आले.



- **फलोत्पादन संचालक डॉ. कैलास मोते यांची माहिती**
- **खरेदीदार-विक्रेता संवाद, प्रशिक्षण कार्यक्रम यशदा येथे संपन्न**

My Pune Edition Edition
Aug 04, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# आशियाई विकास बँकेच्या शिष्टमंडळाकडून 'मॅग्नेट'ची पाहणी

पुणे : पुढारी वृत्तसेवा

आशियाई विकास बँकेच्या अर्थसहाय्याने राबविण्यात येत असलेल्या महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या कामकाजासंदर्भात सुरू असलेल्या प्रकल्पांची पाहणी करून योजनेचा आढावा आशियाई विकास बँकेचे शिष्टमंडळ २९ व ३० जुलै महाराष्ट्र दौऱ्यात घेतला. प्रकल्पाच्या प्रगतीबाबत शिष्टमंडळाने समाधान व्यक्त केले.

या शिष्टमंडळामध्ये आशियाई विकास बँकेचे क्युंगफेंग झँग, देशातील मुख्यालयाच्या प्रमुख मिओ ओका, तसेच यास्मिन सिद्दिकी, ताकेशी युएडा, अलेक्सिया मायकेल्स, नारायण अय्यर, विकास गोयल, कृष्णन रौटेला, राघवेंद्र एन. यांचा समावेश होता.

मुंबई येथे २९ जुलै २०२४ रोजी झालेल्या प्रकल्पाच्या आढावा सभेदरम्यान मॅग्रेट संस्थेचे अध्यक्ष तथा



शिष्टमंडळाला माहिती देताना विनायक कोकरे.

सहकार व पणन विभागाचे अप्पर मुख्य सचिव अनुपकुमार यांनी २०२१ पासून महाराष्ट्राच्या फलोत्पादन मूल्यसाखळी विकासासाठी कार्यरत मॅग्रेट प्रकल्पाची प्रगती व भविष्यातील नियोजनाबाबत आशियाई विकास बँकेच्या शिष्टमंडळास माहिती दिली. दरम्यान, या शिष्टमंडळाच्या भेटीदरम्यान मॅग्रेट प्रकल्पाचे संचालक विनायक कोकरे, तसेच अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव यांनी राज्यातील फलोत्पादन क्षेत्रामध्ये मॅग्रेट प्रकल्पाच्या माध्यमातून झालेल्या कामकाजाबाबत शिष्टमंडळास माहिती दिली.

My Pune Edition Edition
Aug 03, 2024 Page No. 06
Powered by: erelego.com

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# 'श्रीगोंदा येथील पिकाला भौगोलिक मानांकनासाठी प्रयत्न करावा'

**नगर :** आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र अॅग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पाअंतर्गत 'लिंबू -उत्तम कृषी पद्धती' बाबत श्रीगोंदा, जि. अहमदनगर येथे नुकतीच एकदिवसीय कार्यशाळा पार पडली.

लिंबू पिकाला जगाच्या पाठीवर राजमान्यता मिळवण्यासाठी लागवड ते काढणी पश्चात तंत्रज्ञानाबाबत आदर्श कृषी प्रणाली आत्मसात करणे आवश्यक आहे. या उद्देशाने कर्यशाळेचे आयोजन महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ विभागीय कार्यालय, नाशिक, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ पुणे, कृषी विभाग अहमदनगर यांनी श्रीगोंदा येथे केले होते. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ विभागीय कार्यालय, नाशिकचे उपसरव्यवस्थापक शिवपुरी उपस्थित होते.

या वेळी ते म्हणाले की, जगात सर्वात जास्त लिंबाचे उत्पादन भारतात घेण्यात येते व त्यामधे श्रीगोंदा परिसरात येणारे लिंबांचे पीक, त्यांचा दर्जा व त्यांच्या स्वादामुळे प्रसिद्ध आहे. या पिकास जगाच्या पाठीवर राजमान्यता मिळविण्यासाठी लागवड ते काढणी पश्चात आदर्श कृषी प्रणाली शेतकऱ्यांनी आत्मसात करावी.

02/08/2024 | Ahmednagar | Page : 09
Source : https://epaper.loksatta.com

# ‘मॅग्नेट’तर्फे १४३ एफपीसी संचालकांचे क्षमताबांधणी प्रशिक्षण

## सह्याद्री फार्म्स येथे आयोजन; राज्यातील २२ जिल्ह्यांतील कंपन्या सहभागी

Date 02/08/2024

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

नाशिक : महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क प्रोजेक्टतर्फे (मॅग्नेट) सह्याद्री फार्म्स, मोहाडी (जि. नाशिक) येथे नुकतेच राज्यभरातील २२ जिल्ह्यांतील १४३ शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या संचालकांना क्षमता बांधणी प्रशिक्षण देण्यात आले.

सह्याद्री फार्म्स येथे ४ ते २२ जुलै या कालावधीत झालेल्या क्षमता बांधणी प्रशिक्षणात राज्यभरातील नाशिक, संभाजीनगर, रत्नागिरी, लातूर, अमरावती, कोल्हापूर, पुणे, नागपूर या आठ विभागांतून २२ जिल्ह्यांचा समावेश होता. त्यात रायगड, नाशिक, सांगली, कोल्हापूर, पुणे, सोलापूर, नागपूर, जालना, संभाजीनगर, उस्मानाबाद, हिंगोली, अमरावती, धुळे, रत्नागिरी, सातारा, लातूर, बीड, बुलडाणा, जळगाव, धाराशिव, चंद्रपूर आणि अहमदनगर या जिल्ह्यांतील शेतकरी उत्पादक कंपनीच्या संचालकांनी सहभाग घेतला.

सह्याद्री फार्म्स या प्रकल्पामध्ये सेंटर ऑफ एक्सेलेंस म्हणून कार्यरत आहे. शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या बळकटीकरणासाठी संचालकांना संस्थात्मक बांधणी सोबतच आवश्यक सॉफ्ट-स्किल, मॅनेजमेंट स्किल, बँकिंग सारख्या विषयांचे प्रशिक्षण देण्यात आले. राज्य शासनाच्या सहकार व पणन विभागाद्वारे आशियाई विकास बँक (एडीबी) अर्थसहाय्यीत महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प, मॅग्नेट संस्थेमार्फत राज्यातील सर्व जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाद्वारे राज्यातील लहान आणि सीमांत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यावर भर दिला जात आहे. केळी, डाळिंब, संत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरू, चिकू, स्ट्रॉबेरी, भेंडी, मिरची (हिरवी व लाल), फुले, आंबा, लिंबू, काजू आणि पडवळ या निवडक पिकांवर प्रकल्प केंद्रित आहे.

संस्थात्मक क्षमता बांधणी प्रशिक्षणाच्या ४ बॅचेस पूर्ण झाल्या आहेत. त्यात १४३ शेतकरी उत्पादक कंपनीच्या संचालकांनी यात सहभाग घेतला. ४४ महिला संचालकांनी या प्रशिक्षणात सक्रिय सहभाग घेतला. येणाऱ्या काही दिवसात आणखी बॅचेस आयोजित करण्याची योजना आखलेली असून यामध्ये शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक, भागधारक आणि मूल्यसाखळी गुंतवणूकदार सहभागी होणार आहेत. प्रशिक्षणामुळे संचालकांमध्ये नेतृत्वगुण आणि व्यवस्थापन कौशल्ये विकसित होत आहेत. मॅग्नेट प्रकल्पाचे संस्थात्मक क्षमता बांधणी प्रशिक्षण महाराष्ट्रातील फलोत्पादन क्षेत्राला मजबुती देण्यासाठी आणि त्याला अधिक स्पर्धात्मक बनवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. कृषी व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करण्यास मदत होते आहे. ज्यामुळे राज्यातील फलोत्पादनात वाढ होईल.



**नाशिक : एफपीसी संचालकांचे क्षमता बांधणी प्रशिक्षण कार्यक्रमात माहिती घेताना राज्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांचे संचालक.**

> मॅग्नेट प्रशिक्षणातून आवश्यक कौशल्ये आणि सकारात्मक दृष्टिकोन मिळाला. आमचे ज्ञान अद्ययावत झाले असून आम्ही आता अधिक आत्मविश्वासाने कृषी व्यवसाय करू शकतो. आम्हाला अडचणींवर मात करण्यासाठी नवीन प्रयोग करण्याची क्षमता आणि धाडस मिळाले आहे.
>
> – नीलेश चौगुले, संचालक, शाहू महाराज शेतकरी उत्पादक कंपनी, कोल्हापूर

> **मॅग्नेट प्रकल्पांतर्गत शेतकरी उत्पादक कंपनीच्या संचालकांनी प्रशिक्षणाचा लाभ त्यांच्या सभासदांना द्यावा. तसेच कृषी व्यवसायाशी जुळलेल्या शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनात वाढ करून, प्रक्रिया व निर्यात या कृषी क्षेत्रात मोलाचे योगदान द्यावे. राष्ट्राच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी प्रयत्न करावेत.**
>
> **– एस. वाय. पुरी,** विभागीय प्रकल्प उपसंचालक, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, मॅग्नेट, नाशिक

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# सह्याद्री फार्म्स येथे 'एफपीसी' संचालक क्षमता बांधणी प्रशिक्षण

- **मॅग्नेटतर्फे आयोजन; २२ जिल्ह्यांतील कंपन्या सहभागी**

**जानोरी : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क प्रोजेक्ट (मॅग्नेट) तर्फे मोहाडी येथील सह्याद्री फार्म्स येथे २२ जिल्ह्यांतील १४३ शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या संचालकांना क्षमता बांधणी प्रशिक्षण देण्यात आले.

सह्याद्री फार्म्स येथे नुकत्याच झालेल्या क्षमता बांधणी प्रशिक्षणात राज्यभरातील नाशिक, छत्रपती संभाजीनगर, रत्नागिरी, लातूर, अमरावती, कोल्हापूर, पुणे, नागपूर या आठ विभागांतून २२ जिल्ह्यांचा समावेश होता. त्यात रायगड, नाशिक, सांगली, कोल्हापूर, पुणे, सोलापूर, नागपूर, जालना, उस्मानाबाद, हिंगोली, अमरावती, धुळे, रत्नागिरी, सातारा, लातूर, बीड, बुलडाणा, जळगाव, धाराशीव, चंद्रपूर आणि अहमदनगर या जिल्ह्यांतील शेतकरी उत्पादक कंपनीच्या संचालकांनी सहभाग घेतला. शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या बळकटीकरणासाठी संचालकांना संस्थात्मक बांधणी सोबतच आवश्यक सॉफ्ट-स्किल, मॅनेजमेंट स्किल, बँकिंग सारख्या विषयांचे ट्रेनिंग देण्यात आले.

सहकार व पणन विभागाद्वारे आशियाई विकास बँक (एडीबी) अर्थसहाय्यित महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प, मॅग्नेट संस्थेमार्फत सर्व जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाद्वारे राज्यातील लहान आणि सीमांत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यावर भर दिला जात आहे. केळी, डाळिंब, संत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरू, चिकू, स्ट्रॉबेरी, भेंडी, मिरची (हिरवी व लाल), फुले, आंबा, लिंबू, काजू आणि पडवळ या निवडक पिकांवर प्रकल्प केंद्रित आहे.

प्रशिक्षणामुळे संचालकांमध्ये नेतृत्वगुण आणि व्यवस्थापन कौशल्ये विकसित होत आहेत.



**जानोरी : मोहाडी सह्याद्री फार्म्स येथे एफपीसी संचालकांचे क्षमता बांधणी प्रशिक्षणप्रसंगी उपस्थित मान्यवर व प्रशिक्षणार्थी.**

> मॅग्नेट प्रशिक्षणातून आवश्यक कौशल्ये आणि सकारात्मक दृष्टिकोन मिळाला आहे. आमचे ज्ञान अद्ययावत झाले असून, आम्ही आता अधिक आत्मविश्वासाने कृषी व्यवसाय करू शकतो. आम्हाला अडचणींवर मात करण्यासाठी नवीन प्रयोग करण्याची क्षमता आणि धाडस मिळाले आहे.
>
> - **नीलेश चौगुले**, संचालक, शाहू महाराज शेतकरी उत्पादक कंपनी, कोल्हापूर

> मॅग्नेट प्रकल्पांतर्गत शेतकरी उत्पादक कंपनीच्या संचालकांनी प्रशिक्षणाचा लाभ त्यांच्या सभासदांना द्यावा. तसेच कृषी व्यवसायाशी जुळलेल्या शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनात वाढ करून, प्रक्रिया व निर्यात या कृषी क्षेत्रात मोलाचे योगदान द्यावे.
>
> - **एस. वाय. पुरी**, विभागीय उपसंचालक, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, मॅग्नेट, नाशिक

Nashik Edition Edition
Aug 01, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com